# पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे मार्ग राजकीय गरकड्यांत/ चक्रीवादळात.!

- महारेलकडून ६८५ कोटी परत घेण्याची प्रक्रिया सुरू.!
- महारेलने, रेल्वे मंत्र्यांनी शेतकऱ्यांची व जनतेची केली दिशाभूल.
- विकास क्रांती सेना आक्रमक.!जनतेच्या पैशाची धूळधाण.!
- जीएमआरटीचा परीघ ओघळून सुचविला रेल्वे मार्ग




**घारगाव : (समर्थ गांवकरी)**

गेल्या अनेक वर्षापासून पुणे,अहिल्यानगर,नाशिक जिल्ह्यातील सिन्नर,अकोले,संगमनेर,जुन्नर,आंबेगाव तालुक्यांना स्वप्न दाखवणाऱ्या पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्पाचे भविष्य महाराष्ट्र रेल्वे पायाभूत विकास महामंडळ (महारेल) अधिकाऱ्यांच्या मनमानी व भोंगळ कारभाराने आता अंधारात सापडले असून या प्रकल्पासाठी केलेले सर्व्हेशन व जमीन अधिग्रहनात जनतेच्या पैशाची धूळधाण झाल्याने शासनाने मौन धारण केले आहे.तर मूळ सर्व्हेषणात बदल झाल्याने सदरचा रेल्वे मार्ग राजकीय गरकड्यांत सापडला आहे.जीएमआरटीचे कारणाने रेल्वे मार्गात पुन्हा बदल होणार या कारणाने शेतकरी,जनता,व विकास क्रांती सेना आक्रमक झाली आहे.

पुणे नाशिक रेल्वेमार्ग बदलल्यास अनेक गावे रेल्वे व विकासापासून वंचित राहतील,या भीतीपोटी जुनाच मार्ग कायम ठेवण्यासाठी संगमनेर तालुक्यातील पुणे नाशिक राष्ट्रीय महामार्गावर बोटा येथे मागील १२ जानेवारी रोजी विकास क्रांती सेना,विविध संघटना,शेतकऱ्यांचे माध्यमातून तब्बल अडीच तास रास्ता रोको आंदोलन झाले. यापुढेही अशीच तीव्र स्वरूपाचे आंदोलने सुरू राहण्याची चिन्हे स्पष्ट झाले आहे.

केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या घोषणेनंतर जुन्नर तालुक्यातील नारायणगाव जवळील खोडद येथील 'जायंट मीटरवेव्ह रेडिओ टेलिस्कोप'च्या (जीएमआरटी)तांत्रिक अडचणींमुळे या प्रकल्पाला बाधा आल्याचे शासनाकडून सांगण्यात आले. त्यात रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पुणे,अहिल्यानगर,पुणतांबा , शिर्डी,सिन्नर,नाशिक असा रेल्वे प्रकल्प होणार असल्याची घोषणा केली.तर सबंधित रेल्वे प्रकल्प वेगळा असून सदरची घोषणा जनतेत संभ्रम निर्माण करणारी ठरली आहे.सद्य स्थितीत राज्य सरकारने या प्रकल्पासाठी दिलेला सुमारे ६८५ कोटी रुपयांचा निधी 'महारेल' कडून परत घेण्याची प्रक्रिया सुरू केली आहे..हा प्रकल्प आता 'महारेल' ऐवजी मध्यरेल मार्फत राबवला जाणार असल्याचे समोर आले आहे.

पुणे-नाशिक रेल्वे मार्गिका नारायणगाव येथील 'जीएमआरटी' वेधशाळेच्या'बफर झोन'मधून जात आहे. रेल्वेच्या विद्युतीकरणामुळे आणि हायस्पीड वाहतुकीमुळे निर्माण होणाऱ्या लहरींचा फटका वेधशाळेच्या अँटेनांना बसू शकतो,असा आक्षेप 'नॅशनल सेंटर फॉर रेडिओ अस्ट्रोफिजिक्स' ने (एनसीआरए) घेतला होता.. परंतु जीएमआरटीने दिलेल्या माहितीनुसार सुधारित रेल्वे मार्गिका शेवटच्या अँटिना पासून १० किमी दूरवरून नेण्यास कोणतीही तांत्रिक अडचण नसल्याचे त्यांचेकडून सांगण्यात आले आहे. सुधारित आराखड्यानुसार मार्गिका करण्याचा विचार सुरू असल्याने विकास क्रांती सेनेने जीएमआरटी प्रकल्पाचे शेवटचा अँटिना सोडून पश्चिमेकडून १० ते १२ किमीवरून पुणे,तळेगाव चाकण राजगुरुनगर,मचंर जुन्नर,लेण्याद्री, उदापूर,ओतूर,आळेफाटा,बोटा, संगमनेर,देवठाण सिन्नर,नाशिक असा मार्ग सुचविला आहे.

पुणे_नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील वाहतुकीचा भार कमी करण्यासाठी तसेच या तालुक्यातील तीर्थ क्षेत्र, कृषी,पर्यटन क्षेत्रात क्रांती निर्माण करण्यासाठी व आदिवासी समाज बांधवांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रकल्प उदयास आला.

यामुळे पुणे व नाशिक या औद्योगिक वसाहती यांना जोडणारा हा प्रकल्प असून उत्तर व दक्षिण भारताला जोडणारा बहुउद्देशीय प्रकल्प आहे.

सन २०१८ मध्ये मध्यरेल कडून हा प्रकल्प महारेलकडे सोपविण्यात आला होता.पिंक बुक मध्ये नोंद असलेल्या मार्गानुसार रेल्वे प्रकल्प होणे अपेक्षित असताना महारेलचे काही अधिकाऱ्यांनी तत्कालीन महाविकास आघाडी सरकारचे काही नेत्यांचे सोयीनुसार रेल्वे मार्गात बदल करत कमी खर्चीक,व प्रवासासाठी अल्पवेळ लागणाऱ्या रेल्वे प्रकल्पात बदल करत २१० किमी असलेल्या रेल्वे मार्गात बदल करून अंतर २३५ किमी केले. वेळ वाचविण्यासाठी व स्पीड वाढवण्यासाठी ब्रॉडगेज करत सेमी हायस्पीड रेल्वे मार्गात रूपांतर करून प्रकल्प खर्च वाढविला.बदल केलेल्या मार्गावरील शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहण केल्या आहे.

ज्या मार्गाची पिंक बुक मध्ये नोंद नाही.महारेल कडून अशा मार्गावर आतापर्यंत पुणे संगमनेर सिन्नर तालुक्यांत ३१६ कोटी रुपये खर्च करत तब्बल ९९.१८ हेक्टर जमिनीचे संपादन केले.या भागांत काही प्रमाणात मोबदला वाटपही केले आहे. मार्गात बदल झाल्यास भूसंपादन केलेल्या शेतकऱ्यांचे काय.? त्यांना वाटप केलेल्या निधीवर काय निर्णय होणार.? सबंधित जमिनी बाबत शासन काय निर्णय घेणार.!

### निधी परत करण्याची प्रक्रिया सुरू

राज्य सरकारने या प्रकल्पासाठी 'महारेल'ला एक हजार कोटी ६२ लाख रुपये वितरित केले होते.त्यापैकी भूसंपादनावर खर्च झालेले ३१६ कोटी रुपये वगळता,उर्वरित ६८४ कोटी ६२ लाख रुपये परत घेण्याची कार्यवाही सरकारने सुरू केली आहे.

## विठ्ठलराव भोयटे व आप्पासाहेब धायगुडे यांची नागवडे कारखान्याच्या तज्ञ संचालकपदी निवड

**श्रीगोंदा तालुका: (समर्थ गांवकरी)**

सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याच्या तज्ञ संचालकपदी सांगवी दुमाला येथील प्रगतशील शेतकरी व विकास सोसायटीचे उपाध्यक्ष विठ्ठलराव जिजाबा भोयटे तसेच हंगेवाडी-धायगुडेवाडी येथील आप्पासाहेब बाबा धायगुडे यांची निवड करण्यात आली आहे.

दि. १९ मार्च रोजी कारखान्याचे चेअरमन राजेंद्रदादा नागवडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. विठ्ठलराव भोयटे यांनी सांगवी विकास सोसायटीचे संचालक व उपाध्यक्ष म्हणून उल्लेखनीय काम केले आहे. तर आप्पासाहेब धायगुडे यांनी हंगेवाडी ग्रामपंचायत सदस्य तसेच श्रीगोंदा पंचायत समिती





सदस्य म्हणून प्रभावी कामगिरी बजावली आहे. दोन्ही मान्यवरांनी स्व. शिवाजीराव नागवडे यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी, सहकार, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रात मोलाचे योगदान दिले असून, त्यांच्या कार्याचा सर्वत्र गौरव होत आहे. भोयटे व धायगुडे यांच्या निवडीबद्दल कारखान्याचे चेअरमन राजेंद्रदादा नागवडे, उपाध्यक्ष सौ. मेघाताई औटी, संचालक मंडळाचे सदस्य तसेच अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेच्या संचालिका सौ. अनुराधाताई नागवडे, दूध संघाचे चेअरमन दिलीप वागसकर आदी मान्यवरांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## महाराष्ट्र संघात अतुल्य स्पोर्ट्सचे दमदार पाऊल

**पालघर : (समर्थ गांवकरी)**

दि.१७ एप्रिल रोजी श्रीरंग कलानिकेतन,तळेगाव (पुणे) येथे खेलो इंडिया ट्रायबल स्पर्धा,निवड चाचणी पार पडली. या स्पर्धेत अतुल्य स्पोर्ट्स अकॅडमी,विहिगाव मधील मुलांमध्ये देविदास कामडी(प्रथम क्रमांक-संघनायक),सचिन वारे, अमित वारे तर मुलींमध्ये पूजा पुंजारी या चारही खेळाडूंची 2 ते 4 एप्रिल 2026 रोजी छत्तीसगड येथे होणाऱ्या राष्ट्रीय ट्रायबल मल्लखांब स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. ठाणे जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व करत या सर्व खेळाडूंनी यशाला गवसणी घातली आहे.विशेष म्हणजे पूजा पुंजारी ही इयत्ता १० वी ची विद्यार्थिनी असुन १८ एप्रिल रोजी तिचा १० विचा बोर्डाचा शेवटचा पेपर असुनही तिच्या पालकांनी तिला स्पर्धेसाठी पाठवले.

## विधानभवनात आमदार विक्रमसिंह पाचपुते यांची आक्रमक भूमिका

### जिल्ह्याच्या नाव दुरुस्तीपासून शेतकरी, सिंचन व ड्रगविरोधी मुद्द्यांवर ठोस मांडणी

**श्रीगोंदा तालुका :(समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात श्रीगोंदा-नगर मतदारसंघाचे आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी एकाच वेळी अनेक महत्त्वाच्या विषयांवर आक्रमक व परिणामकारक भूमिका घेत सभागृहाचे लक्ष वेधले. जिल्ह्याच्या नावातील त्रुटी, शेतकरी प्रश्न, प्रलंबित सिंचन प्रकल्प तसेच ग्रामीण भागातील वाढती ड्रग तस्करी या मुद्द्यांवर त्यांनी ठाम मांडणी करत प्रशासनाला जागे केले. अधिवेशनादरम्यान सादर झालेल्या विनियोजन विधेयकात अहमदनगर जिल्ह्याचा उल्लेख चुकीचा झाल्याची बाब आमदार पाचपुते यांनी निदर्शनास आणून दिली. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावावरून जिल्ह्याचे "अहिल्यानगर" असे नामकरण



करण्यात आले असून, हा विषय जनभावनांशी निगडित असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे ही चूक तात्काळ दुरुस्त करण्याची व भविष्यात अशा त्रुटी टाळण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश देण्याची मागणी त्यांनी केली. याची दखल घेत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी संबंधित विभागाला तात्काळ कार्यवाहीचे निर्देश दिले. याच अधिवेशनात श्रीगोंदा तालुक्यातील चिंबड-क्षारपट जमिनींचा प्रश्नही त्यांनी प्रभावीपणे मांडला. या जमिनींमुळे अनेक शेतकऱ्यांचे उत्पादन घटून आर्थिक स्थिती डळमळीत झाल्याचे त्यांनी सांगितले. काही प्रयोगशील शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अशा जमिनी पिकाऊ केल्याची उदाहरणे देत, शासनाकडून अनुदान व तांत्रिक मदत मिळाल्यास मोठ्या प्रमाणावर जमीन पुन्हा उत्पादनक्षम होऊ शकते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावर जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सकारात्मक प्रतिसाद देत प्रस्ताव तपासून आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले.

कुकडी कार्यक्षेत्रातील डिंबे–माणिकडोह बोगदा प्रकल्पाचा मुद्दाही त्यांनी ठामपणे मांडला. हा प्रकल्प पूर्ण झाल्यास परिसरातील सिंचन व्यवस्थेला मोठा दिलासा मिळेल, असे सांगत त्यांनी तातडीने मंजुरीची मागणी केली. यावर मंत्री विखे पाटील यांनी लवकरच प्रकल्पास मान्यता देण्याचे संकेत दिले. दरम्यान, ग्रामीण भागात वाढत चाललेल्या ड्रग तस्करीच्या गंभीर समस्येकडेही आमदार पाचपुते यांनी सभागृहाचे लक्ष वेधले. ही समस्या गावागावात पसरत असून युवकांचे भविष्य धोक्यात येत असल्याची चिंता त्यांनी व्यक्त केली. या प्रवृत्तीवर आळा घालण्यासाठी विशेष मोहिमा, सक्षम पोलिस यंत्रणा आणि कठोर कारवाईची गरज त्यांनी अधोरेखित केली. तसेच ग्रामीण भागासाठी स्वतंत्र टास्क फोर्स स्थापन करण्याची मागणीही त्यांनी केली. यावर मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'अमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स' सक्रिय असल्याचे सांगत कठोर कारवाईचे निर्देश दिल्याचे स्पष्ट केले.

## अर्धापूर ते असना राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमणांला लागले बुलडोझर

### रस्त्यावरील गाडे, अवैध पार्किंगला बसणार चोप



**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

नांदेड-नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील वाढती अपघातांची मालिका आणि वाहतुकीचा खोळंबा संपवण्यासाठी आता प्रशासनाने कंबर कसली आहे. अर्धापूर ते असना नदीपर्यंतच्या मार्गावरील सर्व अतिक्रमणे, अवैध होर्डिंग्ज, पार्किंग आणि अनधिकृत दुकाने हटवण्यासाठी बुलडोझर लावून अतिक्रमण हटविण्यास सुरुवात झाली आहे.यासाठी अर्धापूर पोलीस आणि महामार्ग प्राधिकरणाने विशेष मोहीम हाती घेण्यात येणार आहे.

अर्धापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रस्ते सुरक्षेबाबत पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांना सविस्तर निवेदन अर्धापूरचे पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम यांनी दिले होते. या निवेदनात त्यांनी महामार्गावरील त्रुटी आणि गावांच्या सुरक्षेचा प्रश्न मांडला. यावर तात्काळ कार्यवाही करत पोलीस अधीक्षकांनी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्याशी पत्रव्यवहार करून रस्ते सुरक्षा समितीची तातडीची बैठक घेण्याची आणि तज्ज्ञ समिती नेमण्याची शिफारस केली होती. यावर बैठक पार पडली असून प्रशासनाकडून विशेष मोहीम हाती घेण्यात येणार असून अर्धापूर ते असना नदीपर्यंतच्या मुख्य रस्त्यावरील सर्व दुकाने आणि अतिक्रमणे हटवून रस्ता मोकळा केला जाणार आहे.

गत महिन्यात दाभड येथील तीन जणांचा मृत्यू राष्ट्रीय महामार्गावर झाला आहे. दाभड, बामणी, शेलगाव, आणि पिंपळगाव या गावांच्या हद्दीत वारंवार होणारे अपघात रोखण्यासाठी उपाययोजना केल्या जात असुन या गावांच्या हद्दीत गतीरोधक बसवणे आणि वेग मर्यादेचे फलक लावणे अनिवार्य करण्यात आले आहे. तर

हायवे पेट्रोलिंग आणि महामार्गावर हेल्पलाईन नंबरचे फलक कुठेही नसल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे. आता प्रत्येक महत्त्वाच्या ठिकाणी संपर्क क्रमांक लावले जातील आणि महामार्ग पोलिसांची पेट्रोलिंग गाडी तैनात केली जाईल. महामार्गावरील सीएनजी पेट्रोल पंप आणि कार शोरूमजवळ रस्त्यावर होणारी अनधिकृत पार्किंग तसेच 'रॉंग साईड 'ने येणाऱ्या वाहनांमुळे अपघात वाढत आहेत. यावर कडक कारवाईचे संकेत देण्यात आले आहेत. केवळ कारवाई न करता, या समस्यांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी संबंधित गावातील प्रमुख व्यक्तींची विशेष बैठक आयोजित केली जाणार आहे. नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी आणि रस्ते सुरक्षेबाबत जनजागृती करण्यासाठी ही बैठक महत्त्वपूर्ण ठरेल, अर्धापूरच्या राष्ट्रीय महामार्गावर आता बेशिस्त पार्किंग आणि अतिक्रमणांना थारा मिळणार नाही. जिल्हा प्रशासनाच्या या आक्रमक पवित्र्यामुळे प्रवाशांना सुरक्षित प्रवास करता येणे शक्य होणार आहे.

### मोबदला घेऊनही 'अतिक्रमण' कशासाठी?

रस्ता रुंदीकरणात ज्यांची जागा गेली, अशा अनेक व्यवसायिक आणि मालमत्ताधारकांना शासनाने योग्य मोबदला दिला आहे. मात्र, तरीही अनेक ठिकाणी राष्ट्रीय महामार्गावर अनेकांनी अनधिकृत बांधकाम करून दुकाने थाटली ती किरायाणे दिली आहेत. अनेक फळ विक्रेत्यांनी तर थेट मुख्य रस्त्यावरच आपली दुकाने लावल्याने वाहनचालकांना कसरत करावी लागत आहे. अवैध पार्किंग, अवैध अतिक्रमणामुळे महामार्गावर अपघातांचे प्रमाण वाढल्याचे चित्र आहे.


## हिंदू-मुस्लिम ऐक्याचा संदेश : संभाजी ब्रिगेडतर्फे श्रीगोंद्यात इफ्तार पार्टीचे आयोजन

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**



हिंदू-मुस्लिम ऐक्याचा संदेश देत संभाजी ब्रिगेडतर्फे श्रीगोंदा शहरातील जामा मस्जिद येथे इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचे नेतृत्व जिल्हाध्यक्ष अरविंद कापसे यांनी केले. कार्यक्रमाला शेकडो हिंदू आणि मुस्लिम बांधवांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत सहभाग नोंदवला. इफ्तार पार्टीदरम्यान उपस्थित मुस्लिम बांधवांना फळे, ज्यूस, खजूर, सरबत आदींचे वाटप करण्यात आले. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून पारनेर येथील डॉ. रफिक सय्यद यांनी रोजाच्या महत्त्वाविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी रोजा म्हणजे केवळ उपाशी राहणे नसून तोंडाचा, हाताचा आणि डोळ्याचा रोजा यांसारख्या विविध प्रकारांद्वारे संयम आणि आत्मशुद्धी साधली जाते, असे स्पष्ट केले. "आपण सर्व एकाच आई-वडिलांची लेकरं आहोत, 'अवघी एकाचीच वीण, तेथे कसे भिन्नाभिन्न?" असा संत तुकाराम महाराजांच्या अभंगाचा दाखला देत त्यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. इफ्तारनंतर संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष अरविंद कापसे यांनी ईदच्या निमित्ताने परस्परांतील प्रेम, बंधुभाव आणि सलोखा अधिक दृढ करण्याचे आवाहन करत शुभेच्छा दिल्या. तसेच जिल्हा संघटक मुकुंद सोनटक्के यांनीही उपस्थितांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाला मुस्लिम बांधवांमध्ये रिजवान जमादार, मौलाना मोहद्दीन आतार, मुन्नाभाई तांबोळी, जैनुभाई अत्तर, बबलू जकाते, तिलाही मालजपते, शाहरुख जकाते, जहीर जकाते यांसह मोठ्या संख्येने उपस्थिती होती. तसेच संभाजी ब्रिगेडचे जिल्हा कार्याध्यक्ष सुनील ढवळे, जिल्हा उपाध्यक्ष नाना शिंदे, तालुका अध्यक्ष वैभव वनशिव, जिल्हा संघटक गणेश पारे, तालुका उपाध्यक्ष सागर हिरडे, शहराध्यक्ष अभिषेक सावंत, सत्यशोधक भीमराव कोथिंबीरे, व्याख्याते मिसाळ सर, मोहनराव भिंताडे, पृथ्वीराज वाजे आदी मान्यवर आणि पदाधिकारी उपस्थित होते.

## गुढीपाडव्याच्या निमित्ताने महिलांची बाईक रॅली उत्साहात संपन्न




**संगमनेर: (समर्थ गांवकरी)**

श्रीराम नवमी व हनुमान जयंती उत्सव समिती, चंद्रशेखर चौक संगमनेर महिलाशक्तीच्या वतीने गुढीपाडवा हिंदू नववर्षानिमित्त महिलांची भव्य बाईक रॅली उत्साहात संपन्न झाली. या रॅलीत मोठ्या संख्येने महिलांनी सहभाग नोंदवून हिंदू संस्कृतीप्रती आपला अभिमान व्यक्त केला. पारंपरिक वेशभूषा, भगवे झेंडे आणि देशभक्तीपर घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. रॅलीमुळे शहरात उत्सवी आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. या उपक्रमाचे नियोजन सायली जोशी व सखी तसेच त्यांच्या सहकाऱ्यांनी उत्कृष्टरीत्या केले. रॅलीचे व्यवस्थापन, शिस्तबद्ध आयोजन आणि महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद यामुळे हा उपक्रम यशस्वी ठरला. या रॅलीमुळे महिलांमध्ये एकजूट वाढून सामाजिक आणि सांस्कृतिक जाणीवा अधिक दृढ झाल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. या रॅलीचे संपूर्ण नियोजन चंद्रशेखर हिंदू मंडळाच्या कार्यकर्त्यांनी केले होते. व पोलीस प्रशासनाचे विशेष सहकार्य लाभले.

## लोडशेडिंगविरोधात खा. निलेश लंके यांचे ठिय्या आंदोलन; महावितरणला थेट इशारा

- सायंकाळची वीज कपात तात्काळ थांबवा, अन्यथा कार्यालय बंद करू
- शेतकरी, विद्यार्थी व महिलांच्या प्रश्नांवरून तीव्र संताप
- दोन दिवसांत निर्णय न झाल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा

**(समर्थ गांवकरी)**



जिल्ह्यात सुरू असलेल्या सायंकाळी ६ ते १० वाजेपर्यंतच्या लोडशेडिंगविरोधात खासदार निलेश लंके यांनी महावितरण कार्यालयात ठिय्या आंदोलन करत प्रशासनाला धारेवर धरले. वाढत्या वीज कपातीमुळे शेतकरी, विद्यार्थी व महिलांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचा आरोप करत त्यांनी लोडशेडिंग तात्काळ बंद करण्याची मागणी केली.

महावितरणच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करताना खासदार लंके यांनी स्पष्ट इशारा दिला की, सायंकाळच्या वेळेतील लोडशेडिंग तात्काळ बंद करा, अन्यथा महावितरणचे कार्यालय बंद करण्यास भाग पाडू.

यावेळी नाशिक विभागाचे अधीक्षक अभियंता सुंदर लटपटे यांच्याशी त्यांनी सविस्तर चर्चा केली. या आंदोलनात जिल्हा परिषद सदस्य बाळासाहेब हराळ, प्रा. सिताराम काकडे, रामेश्वर निमसे, श्रीकांत जगदाळे, अमोल खाडे, एकनाथ गांगर्डे, भाऊसाहेब काळे, पोपट पुंड, उद्योजक अल्ताफ शेख यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

खासदार निलेश लंके यांनी सांगितले की,

"लोडशेडिंगमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. सध्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरू आहेत, त्यामुळे त्यांच्या अभ्यासावर परिणाम होत आहे. तसेच महिलांच्या स्वयंपाकाच्या वेळेत वीज नसल्याने अडचणी वाढल्या आहेत. ग्रामीण भागात बिबट्याच्या भीतीमुळे अंधारात राहणे धोकादायक ठरत आहे.

ते पुढे म्हणाले की, या प्रश्नावर अधिकाऱ्यांशी सकारात्मक चर्चा झाली असून दोन दिवसांत वीजपुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. आरडीसी योजना पूर्ण क्षमतेने सुरू झाल्यानंतर २४ तास वीज पुरवठा शक्य होईल.

सरकारवर टीका करत त्यांनी प्रश्न उपस्थित केला की, लोडशेडिंग करून शेतकऱ्यांची मुले गुरांमागे पाठवायची का? त्यांना शिक्षणापासून वंचित ठेवायचे का?

दरम्यान, अधीक्षक अभियंता सुंदर लटपटे यांनी सांगितले की, वीज चोरी हा गंभीर प्रश्न असून तो नियंत्रणात आल्यानंतर २४ तास वीज पुरवठा देणे शक्य होईल. शक्य तितक्या प्रमाणात लोडशेडिंग कमी करण्यासाठी उपाययोजना करण्यात येतील.

यावेळी जिल्ह्याचे अधीक्षक अभियंता रमेश कुमार पवारही उपस्थित होते. अहिल्यानगर शहराला दिल्लीगेट व माळीवाडा वेशेची पारंपारिक ओळख आहे. जाणीवपूर्वक राजकारण करून माळीवाडा वेस पाडण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप खासदार निलेश लंके यांनी केला. काही समाजकंटक यामागे असल्याचे सांगत त्यांनी या प्रकाराला तीव्र विरोध दर्शवला. शहरातील सामाजिक संघटनांनीही या निर्णयाला विरोध केला असून आपणही त्यांच्यासोबत ठामपणे उभे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

तसेच शाहू-फुले-आंबेडकर यांच्या विचारांवर आपण राजकारण करत असून महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांचे पुतळे उभारले जावेत, अशी मागणी त्यांनी केली. खासदार लंके यांनी पुढे सांगितले की, जिल्ह्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यांनी स्वतः पाहणी करून प्रशासनाला पंचनामे तातडीने करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

# श्री क्षेत्र पिंपळगाव नाकविंदा येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

■ पंचक्रोशितील सर्व भाविकांनी या ज्ञानदानाचा लाभ घेऊन आपले संसारीक जीवन सुखमय करण्याचे ग्रामस्थांच्या वतीने आव्हान



**राजूर : (समर्थ गांवकरी)**

सर्व धर्मानुरागी भावीक भक्तांना कळविण्यात अत्यानंद होतो की, सालाबादाप्रमाणे याही वर्षी प्रभु श्रीरामचंद्राच्या दंडकारण्यामध्ये महर्षी अगस्ती मुनी, राजा हरिश्चंद्र व छत्रपती शिवाजी महाराज आणि महालक्ष्मी मातेच्या कृपाशिर्वादाने श्री विठ्ठल मंदीर देवस्थान ट्रस्ट आयोजीत मौजे श्री क्षेत्र पिंपळगाव नाकविंदा(ता.अकोले) येथे सोमवार दि. २३/०३/२०२६ ते सोमवार दि.३०/०३/२०२६ या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले आहे. यावेळी सकाळी ४ ते ६ काकडा, सकाळी ११ ते १२ गाथा भजन,दुपारी ३ ते ४ नियमाचे भजन, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ, सायंकाळी ७ ते ९ हरिकिर्तन व नंतर महाप्रसाद आदी दैनंदीन कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.

सोमवार दि.२३/०३/२०२६ रोजी ह.भ.प.बाळू महाराज काळे ( पिंपळगाव नाकविंदा), मंगळवार दि. २४/०३/२०२६ ह.भ.प. एकनाथ महाराज शिंदे ( आळंदी), बुधवार दि. २५/०३/२०२६ ह.भ.प. दत्ता महाराज भोर (माळेगाव पठार ), गुरूवार दि.२६/०३/२०२६ ह.भ.प. रोजी सकाळी रामनवमी निमित्त ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज बोगीर (निफाड ) तसेच सायंकाळी ह.भ.प.रमेश महाराज भोर ( धामणगाव पाट) शुक्रवार दि. २७/०३/२०२६ ह.भ.प.मनोहर महाराज घोडे ( घोटी ), शनिवार दि.२८/०३/२०२६ ह.भ.प. अमोल महाराज भोत (रूंभोडी),रविवार दि. २९/०३/२०२६ ह.भ.प. चैतन्यगिरी महाराज (केळी रूम्हणवाडी ) यांचे हरीकिर्तन संपन्न होणार आहेत. तसेच सोमवार दि.३०/०३/२०२६ रोजी सकाळी ७ ते ९पायी दिंडी पालखी सोहळा यानंतर ह.भ.प. राजेंद्र महाराज सदगीर (मुथाळणे ) यांचे सकाळी ९ वा. काल्याचे किर्तन होईल व नंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होईल. पंचक्रोशितील सर्व भाविकांनी या ज्ञानदानाचा लाभ घेऊन आपले संसारीक जीवन सुखमय करावे. असे समस्त ग्रामस्थ पिंपळगाव नाकविंदा, आढळवाडी, सोंगाळवाडी, श्री विठ्ठल देवस्थान ट्रस्ट आदिंनी आव्हान केले आहे.




ठाणे : ठाण्यात चैत्र नवरात्रौंत्सवाच्या उत्साहाला भक्तीमय वातावरणात प्रारंभ झाला आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून ठाणे पूर्व, कोपरी येथील संत तुकाराम क्रीडांगणात धर्मवीर श्री आनंद दिघे प्रतिष्ठान आयोजित चैत्र नवरात्रोत्सवात पहिल्याच दिवशी भक्ती, संगीताच्या सुरेल कार्यक्रमाने वातावरण भक्तीरसात न्हाऊन निघाले. यावेळी उपस्थित भाविक रसिक महिलांनी तर मंडपातच फेर धरून मातृशक्तीच्या सुरेल सादरीकरणाला दाद दिली. चैत्र शुद्ध प्रतिपदा अर्थात गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर दुपारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चैत्र नवरात्रौत्सवात देवीची प्राणप्रतिष्ठा करून सहकुटुंब विधिवत पूजन केले. सायंकाळी ठाण्याच्या महापौर शर्मिला रोहित पिंपळोलकर यांच्या हस्ते देवी मातेची विधीवत आरती करण्यात आली. यावेळी शिवसेना कल्याण जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, प्रकाश कोटवानी, राहुल लोंढे यांच्यासह अनेक शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात बातम्या...



### अकोलेत आदिवासी शेतकऱ्यांचे भात खरेदी समस्यांबाबत निवेदन

अकोले **(स. गांवकरी)** : अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील आदिवासी शेतकऱ्यांनी भात खरेदीसंदर्भातील विविध समस्यांबाबत व्यवस्थापकीय संचालक, आदिवासी सहकारी महामंडळ, नाशिक यांना निवेदन सादर केले आहे. यंदा अवकाळी पाऊस व अतिवृष्टीमुळे भात पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेतकऱ्यांचे सुमारे ५० ते ५५ टक्के उत्पन्न घटले आहे. त्यामुळे आदिवासी शेतकरी आर्थिक संकटात सापडले असून शासनाने तातडीने दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी भात खरेदीसाठी हेक्टरी ३० ते ३५ हजार रुपये बोनस जाहीर करावा, पुढील हंगामात भाताला ४,००० ते ४,५०० रुपये प्रति क्विंटल हमीभाव द्यावा तसेच बाळ हिरडा ३०० ते ३५० रुपये दराने खरेदी करावा, अशा प्रमुख मागण्या मांडल्या आहेत. डोंगराळ व दुर्गम भागातील शेतकऱ्यांना शिक्षण, आरोग्य व घरखर्च भागवणे कठीण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास तीव्र स्वरूपाचे रस्ता रोको आंदोलन छेडण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. यावेळी अनंत घाणे, भरत घाणे, बाजीराव सगभोर, मारुती खाडे, देविदास भागडे, दिपक भागडे, अजित कडाळी, समीर मुठे, मधुकर खाडे, अंकुश भवारी, एकनाथ खाडे, काशिनाथ घाणे, गणपत खाडे, लक्ष्मण घोडे, वाल्मीक खाडे आदींसह वारंघुशी, बारी, पेंडशेत परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, डांगी जनावरांच्या संवर्धनासाठीही शेतकऱ्यांनी स्वतंत्र निवेदन देत आर्थिक मदत, चाऱ्याची उपलब्धता व पशुपालकांना मासिक सहाय्य देण्याची मागणी केली आहे.

### गुढीपाडव्याच्या या मुहूर्तावर मोफत छाती रोग तपासणी शिबीर संपन्न

अहिल्यानगर **(स. गांवकरी)** : सावेडी येथील नगर चेस्ट क्लिनिकच्या वतीने मराठी नववर्ष 'गुढी पाडवा'च्या मुहूर्तावर मोफत छाती रोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सुप्रसिद्ध छाती रोग तज्ञ डॉ. दत्तात्रय नागरे यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर पार पडले. या शिबिराचे उद्घाटन भाजपा ज्येष्ठ नेते तथा माजी नगरसेवक श्री. भैय्या गंधे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रभागातील युवा नगरसेवक करण कराळे, नगरसेवक पुष्कर कुलकर्णी तसेच नगरसेवक योगीराज गाडे यांनी उपस्थित राहून शिबिराला भेट दिली. त्यांनी नगर चेस्ट क्लिनिकच्या संपूर्ण टीमचे कौतुक केले. शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून मोठ्या संख्येने रुग्णांनी तपासणीचा लाभ घेतला. भविष्यातही अशा प्रकारची आरोग्यसेवा अहिल्यानगर जिल्ह्यात राबविण्याचा मानस डॉ. नागरे यांनी व्यक्त केला.


### पुणे एस. पी. ऑफीस चौक ते जी.पी.ओ. चौक येथे वहातुक मार्गात बदल

अहिल्यानगर **(स. गांवकरी)** : पुणे या मार्गावरील एस.पी.ओ.चौक ते जी.पी.ओ. चौक या रोडवरील येणारी व जाणारी सर्व प्रकारच्या वाहतुक मार्गात बदल केले. दि. २१ मार्च २०२६ रोजी ( चंद्र दर्शनानुसार एक दिवस पुढे मागे) या दिवशी मुस्लीम बांधवांचा रमजान ईद सण असल्याने कोठला ईदगाह मैदान या ठिकाणी नमाज पठण करण्यात येणार आहे. सदर इदगाह मैदान हे अहिल्यानगर – पुणे महामार्गालगत आहे.

## अस्मिता राज्यस्तरीय पिंच्याक सिलॅट लीग महाराष्ट्र भव्य स्पर्धेचे आयोजन

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

अस्मिता राज्यस्तरीय पिंच्याक सिलॅट लीग महाराष्ट्र या स्पर्धेचे आयोजन स्पोर्ट अथॉरिटी ऑफ इंडिया साई च्या मान्यतेने व इंडियन पिंच्याक सिलॅट फेडरेशन च्या मार्गदर्शनाने महाराष्ट्र पिंच्याक सिलॅट असोशियन ने सर्वेश्वर महादेव ट्रस्ट च्या इंदोर हॉल तपोवन नाशिक येथे २१ ते २२ मार्च २०२६ रोजी सर्व वयोगटातील महिला खेळाडूंसाठी केले आहे स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील २२ जिल्ह्यातील ८०० महिला खेळाडू सहभागी होणार आहेत या स्पर्धेची सर्व व्यवस्था विनामूल्य करून खेळाडूंना चांगली सुविधा प्राप्त करून देण्यात येणार आहे




या स्पर्धेमध्ये नाशिक मधील ३०० खेळाडू सहभागी होणार आहेत स्पर्धेचा उद्घाटन समारंभ २१ मार्च रोजी सकाळी १० वाजता होईल व स्पर्धेचा अंतिम बक्षीस समारंभ २२ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता विविध मान्यवरांच्या हस्ते होईल

पिंच्याक सिल्याट इंडोनेशियन मार्शल आर्ट चा खेळ प्रकार असून (१) ट डींग (फाईट) (२) तुंगल (सिंगल काता) (३) रेगु (ग्रुप काता), (४) गांडा (डेमी फाईट) (५) सोलो (इव्हेंट) या पाच प्रकारात खेळला जातो. सप्टेंबर २०२० ला या खेळाचा समावेश भारतीय क्रिडा मंत्रालय, भारत सरकार यानी आपल्या ५% राखीव नोकर भरती मध्ये केला आहे. या खेळाला "युवक कल्याण आणि किडा मंत्रालय भारत सरकार", "भारतीय विश्वविद्यालय संघ, अखिल भारतीय पोलीस खेळ नियंत्रण बोर्ड ऑलिम्पिक काउंसिल ऑफ एशियायी ची मान्यता आहे. हा खेळ एशियन गेम, एशियन मार्शल आर्ट गेम, युथ गेम व ऐशियन बीच गेम, नॅशनल गेम्स, खेलो इंडिया बीच गेम्स, अस्मिता खेलो इंडिया लीग अशा ऑफिशियल राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धामध्ये खेळला जातो त्यामुळे खेळाडूंना सरकारी 5% नोकर भरती मध्ये अनेक संदीप प्राप्त होत आहेत

या खेळामध्ये मागील १३ वर्ष महाराष्ट्र संघ अव्वल स्थानी आहे.

अशी माहिती किशोर येवले राष्ट्रीय अध्यक्ष इंडियन पिंच्याक सिलॅट फेडरेशन आणि महा सचिव महाराष्ट्र पिंच्याक सिलॅट यांनी व केतन गुंजाळ नाशिक जिल्हा पिच्याक सिलॅट असोसिएशन यांनी दिली.

## नशामुक्त भारत अभियानांतर्गत जनजागृती कार्यक्रम संपन्न

**ठाणे:कल्याण : (समर्थ गांवकरी)**



प. रा. विद्यालय, भिवंडी येथे अमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, कोकण कृती विभाग यांच्या वतीने "नशामुक्त भारत अभियान" अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना अमली पदार्थांचे दुष्परिणाम, त्यापासून दूर राहण्याचे महत्त्व तसेच निरोगी आणि सकारात्मक जीवन जगण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून पीएसआय श्री. तावडे सर, हवालदार जगताप व कांबळे, तसेच पोलीस नाईक मगरे उपस्थित होते. तसेच RSP समुदेशक श्री. मनिलाल शिंपी सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.या कार्यक्रमास शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.नंदा कोंगे मॅडम, पर्यवेक्षिका सौ.कोठे मॅडम यांची विशेष उपस्थिती होती.

## पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

नांदेड जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नांदेड व परमवीर चक्र कॅप्टन गुरबचन सिंग सलारिया शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था नायगाव यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दि २४ मार्च रोजी परमवीर चक्र कॅप्टन गुरबचन सिंग सलारिया शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था नायगाव येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय प्लेसमेंट ड्राईव्ह/रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या प्लेसमेंट ड्राईव्ह /रोजगार मेळाव्यामध्ये विविध खाजगी आस्थापनामध्ये रोजगार व नोकरीच्या संधी साठी मुलाखती घेण्यात येणार असून जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांनी मंगळवार दि २४ मार्च सकाळी १० वा. पासून परमवीर चक्र कॅप्टन गुरबचन सिंग सलारिया शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था नायगाव येथे उपस्थित राहून या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नांदेड यांनी केले आहे.

## मुक्ता कदम प्रकरणी मुदखेड पत्रकार संघाचा निषेध; गुन्हा मागे घेण्याची मागणी

**मुदखेड : (समर्थ गांवकरी)**

नांदेड महानगरपालिका निवडणुकीत ग्राउंड रिपोर्टींग केल्याबद्दल पत्रकार मुक्ता कदम यांच्यावर दाखल करण्यात आलेल्या आचारसंहिता भंगाच्या गुन्ह्याविरोधात मुदखेड तालुक्यातील पत्रकार संघ आक्रमक झाला आहे.

जिल्हा मुख्य निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांना तहसीलदारामार्फत निवेदन देत हा गुन्हा तात्काळ मागे घेण्याची मागणी करण्यात आली. नांदेड महानगरपालिका - २०२६ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर



शहरातील पाणीटंचाई, अस्वच्छता, आरोग्य, शिक्षण व रस्त्यांचा प्रश्न इ. मुलभूत प्रश्नांवर बोट ठेवत वृतांकन केल्यानंतर दोन महिन्यांनीच मुक्ता कदम यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यावेळी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सिद्धार्थ चौदंते, माजी जिल्हा संघटक प्रताप देशमुख, संदीप देशमुख, रुकमाजी शिंदे, दिनेश शर्मा, अतिक अहमद, उत्तम हनुमंते, गंगाधर डांगे, जयराम वने, साहेबराव गागलवाड, साहेबराव हौसरे, संतोष सावंत, हाफिज खुरेशी, व्यंकटी मुंगल, मोहम्मद हकीम,संतोष दर्शनवाड, इत्यादी पत्रकार उपस्थित होते.

## शब्दगंध साहित्यिक परिषदेकडून ग्रंथालयास २२५ पुस्तके भेट

**पाथर्डी : (समर्थ गांवकरी)**

शहरातील श्री तिलोक जैन विद्यालय हे एक उपक्रमशील विद्यालय म्हणून गणले जाते. विद्यालयात सतत नाविन्यपूर्ण उपक्रमाचे आयोजन केले जाते. याच अनुशंगाने सध्या विद्यालयात माजी विद्यार्थी संघ समिती स्थापन करून या समितीच्या माध्यमातून ग्रंथालय समृद्धीकरण योजना या अंतर्गत जास्तीत जास्त माजी विद्यार्थ्यांनी ग्रंथालयास पुस्तके भेट द्यावीत व वाचन संस्कृती विकसित करावी असे आवाहन करण्यात आले आहे .यास भरभरून प्रतिसाद मिळत आहे. या आवाहनाला अनुसरून शब्दगंध साहित्यिक परिषद महाराष्ट्र राज्य



यांच्या वतीने ग्रंथालयास जवळपास सत्तावीस हजार रुपये किमतीची 225 पुस्तके भेट देण्यात आली. यावेळी परिषदेचे संस्थापक सचिव सुनील गोसावी, अध्यक्ष राजेंद्र उदागे, राज्य संघटक डॉ.अशोक कानडे, उपाध्यक्ष डॉ.जी.पी . ढाकणे, राज्य कार्यवाह भारत गाडेकर, पाथर्डी तालुका अध्यक्ष अशोक दौंड ,माजी विद्यार्थी समितीचे प्रसिद्धी प्रमुख पत्रकार अनिल खाटेर, विद्यालयाचे प्राचार्य अजय भंडारी,उपमुख्याध्यापक अशोक गर्जे,पर्यवेक्षिका मनिषा मिसाळ ,सुधाकर सातपुते, कार्यालयीन प्रमुख महेंद्र राजगुरू,परिषदेचे माजी तालुकाध्यक्ष डॉ.अनिल पानखडे,माजी विद्यार्थी समिती प्रमुख सुनील कटारिया, चंद्रकांत उदागे, कमलेश मुथ्या ,अजिनाथ शिरसाट , ग्रंथपाल मच्छिंद्र बाचकर आदी उपस्थित होते. यावेळी डॉ अशोक कानडे ,डॉ. जी.पी . ढाकणे व अशोक दौंड यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी बोलताना ते म्हणाले की, तिलोक जैन विद्यालयाने सुरू केलेला हा उपक्रम अतिशय नाविन्यपूर्ण व अभिनव असून यातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास निश्चित मदत होईल व विद्यार्थी वाचनाकडे वळतील. वाचन संस्कृतीच्या वाढीच्या दृष्टीने उचललेले हे पाऊल अतिशय स्तुत्य आहे या बद्दल सर्वच मान्यवरांनी विद्यालयाचे विशेष अभिनंदन केले.शब्दगंध साहित्य परिषद ही राज्यातील विविध ग्रंथालयांना पुस्तके भेट देणे , साहित्य संमेलनाचे आयोजन करणे , विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करणे यात सतत अग्रेसर असते. त्यामुळे त्यांना आवाहन केल्याबरोबर त्यांनी व्यापक दृष्टिकोन समोर ठेवून विद्यालयास तातडीने पुस्तक उपलब्ध करून दिल्याबद्दल विद्यालयाच्या वतीने देखील सर्व उपस्थित मान्यवरांचे विशेष अभिनंदन करण्यात आले. विशेष म्हणजे यावेळी माजी विद्यार्थी संघ समितीचे प्रसिद्धी प्रमुख पत्रकार अनिल खाटेर यांनी देखील जवळपास दीड हजार रुपये किमतीची दहा पुस्तके उस्फूर्तपणे भेट दिली.

या उत्साहवर्धक कार्यक्रमाचे प्रास्तविक व सूत्रसंचालन सुनिल कटारिया यांनी केले तर आभार प्राचार्य अजय भंडारी यांनी मानले.

# मानवतेचे दर्शन घडवणारा पवित्र रमजान...!

**वैजापुर : (समर्थ गांवकरी)**



भारतीय संस्कृती हि विविध जात, धर्म, आणि पंथाने नटलेली आहे यातील एक मुख्य धर्म म्हणजे इस्लाम. इस्लाम धर्माचा ज्याने स्वीकार केला त्याने साक्षात स्वर्गाचा मार्ग पत्करला. इस्लाम म्हणजे मानवतेचे दर्शन घडवणारा धर्म ,इस्लाम धर्माची शिकवण काटेकोरपणे पालन करणारा व्यक्ती स्वार्थ ,अहंकाराचा बळी होत नाही. कोणत्याही परिस्थीतीत तो अत्यंत समाधानी असतो. सत्य आणी त्याचा मार्ग कधीही सोडत नाही. आपल्याकडून इतरांना त्रास होणार नाही याची सदैव दक्षता घेतो , गरजूंना साथ देतो. शेजाऱ्याच्या सुख-दु:खात तो सहभागी होतो.या शिवाय दान ,धर्म करण्यात तो अग्रेसर असतो. या सगळ्या मागे त्याचा एकच उद्देश असतो तो म्हणजे अल्लाह ची प्रसन्नता आणि त्याची रजामंदी प्राप्त करणे ,अल्लाहची प्रसन्नता आणि त्याची रजानम प्राप्त करायला फक्त इतकेच कर्म पुरेसे नाही त्याला त्याची प्रार्थना करणे ही अत्यंत आवश्यक आहे अल्लाहचे रसुल, प्रेषक हजरत मोहम्मद पैगंबर यांची शिकवण आत्मसात करणे तितकेच आवश्यक आहे. इस्लाममध्ये प्रार्थनेचे विविध प्रकार आहेत जसे हिंद नमाज ,रोजा ,जकात, हज यापैकी रोजा इस्लामी दिनदर्शिकेमधला एक महिना ज्याला रमजान म्हणून ओळखले जाते. या शुभ महिन्यात स्वर्गाचे दरवाजे उघडले जातात आणि वाईट प्रवृत्तीला कैद केले जाते. दया आणि प्रामाणिकतेची सुरवात या महिन्यापासून होते. त्यामुळे प्रत्येक इस्लामी या सणाची आतुरतेने वाट पाहत असतो. याच महिन्यातच हजरत मुहम्मद पैगंबरांना त्यांच्या अखंड साधनेचे, खडतर तपश्चर्येचे फळ प्राप्त झाले. अर्थात त्यांना अल्लाहचे दर्शन झाले. ज्या परमेश्वराच्या साक्षात्कारासाठी हजरत मुहम्मद पैगंबरांनी तहान, भूक, दुनियादारी या साऱ्या गोष्टींना तिलांजली देऊन परमेश्वराची इमानेइतबारे इबादत (प्रामाणिकपणे प्रार्थना) केली, तो परमेश्वर याच महिन्यात त्यांना प्रसन्न झाला. त्यांची ईश्वरसेवा खऱ्या अर्थाने कबूल झाली. पैगंबरांची इबादत स्वत:साठी नव्हतीच मुळी. ती इबादत होती लोककल्याणासाठी, समस्त मानवमुक्तीसाठी. या महिन्यापासूनच पवित्र कुराणाचा संदेश त्यांच्यापर्यंत पोहोचण्याला सुरुवात झाली. ईश्वराच्या प्रसन्नतेची, विशालतेची साक्ष देणारा महिना म्हणूनही या महिन्याचे आगळेवेगळे स्थान अबाधित आहे. माणसाला त्याच्या भल्याबुऱ्याची, पाप-पुण्याची जाणीव करून देणाऱ्या या महिन्यात उपवास रोज कराचा असतो. उपवास म्हणजे आत्म्याचे, आचारविचारांचे शुद्धीकरण होय. माणसाच्या या आचार-विचारांच्या शुद्धीकरणाची ही गरज कितीतरी वर्षापूर्वी सांगण्यात आली आहे. आजही त्याची नितांत गरज भासते. यावरून पैगंबरांच्या दूरदृष्टीची कल्पना सहजगत येऊ शकते. रमजानमधील रोजा म्हणजे सहरीपासून इफ्तारपर्यंत(सूर्योदयापासून-सूर्यास्तापर्यंत) निव्वळ अन्न-पाण्यापासून दूर राहून भुकेची जीवघेणी यातना सहन करणे एवढेच नव्हे तर आखून देण्यात आलेली कुंपणे, बंधने, मर्यादा यांचे तंतोतंत पालन या महिन्यात करणे. या महिन्यातील बंद्याची इबादत अल्लाहला अधिक पसंत असते. या महिन्यातल्या इबादतीचा असर, नूर काही वेगळाच असतो. सर्व मुस्लिम बांधव या महिन्यात रोजा ठेवतात. प्रत्येक घरातील लहान थोर मंडळी रोजा करतात. रमजानच्या काळात सकाळी चंद्र उगवण्याच्या अगोदरपासून ते सूर्यास्तापर्यंत काहीही खाऊ नये. रोजा सोडल्यानंतरच अन्नपदार्थ खाण्याची परवानगी आहे. केवळ उपाशी राहणे म्हणजे रोजा नाही. रोजा शरिराच्या प्रत्येक अवयवाचा असतो. डोळ्याचा , तोंडाचा , कानाचा, नाकाचा, मनाचा रोजा पाळणे म्हणजेच रोजा होय. ईश्वरालाही उपाशीपोटी राहणे आवडत नाही.




जे लोक प्रामणिकपणे रोजा पूर्ण करतात मनावर पंचेंद्रियांवर संयम ठेवतात त्यांच्यावरच ईश्वर प्रसन्न असतो. रोजा करणारा मुसलमान कयामतच्या दिवशी अल्लाचा प्रामाणिक बंदा म्हणून ओळखला जातो. रोजा करणारा प्रत्येकजण आपल्याला वाईटापासून दूर ठेवून पावित्र्य पाळण्याचा प्रयत्न करतो.

प्रामाणिकपणे प्रत्येकाने ईश्वरापुढे आपल्या गुन्ह्यांची माफी मागावी आणि यापुढे कोणत्याही प्रकारच्या गुन्हेगारीत सहभागी होणार नसल्याची प्रतिज्ञा करावी. दिवसातून पाच वेळा (फजर, जोहर, असर, मगरीब, इश) नमाज पठण केले पाहिजे. या पवित्र महिन्याचा शुभारंभ चंद्र दर्शनाने होतो आणी मानवाला त्याची स्वकर्माची जाणिव करुन एक वर्षासाठी चंद्र दर्शनाने निरोप घेतो रमजान उल मुबारक मध्ये अल्लाहची दिलेली बरकत तर असतेच त्या शिवाय एक मनाला प्रसन्न करणारी आणि दोन शत्रुंनाही प्रेमाच्या बंधनात आणि मैत्रीच्या सागरात सामावून घेणारी घटना असते त्याला 'इद उल फित्र' असे म्हणतात. 'ईद हे मानवतेला बळकट आणि दुसर्यंच्या सुख-दु:खात सहभागी होण्याचा प्रसन्नतेचे प्रतिक आहे'.

# स्वातंत्र्य, न्याय हक्कांचा संघर्ष अजूनही संपलेला नाही

## भगतसिंह यांचे पुतणे व विचारवंत किरणजितसिंह यांनी पुण्यात माध्यमांशी बोलताना व्यक्त केली खंत

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

"भगतसिंह हे केवळ देशासाठी हुतात्मा झालेल्या क्रांतिकारकाचे नाव नाही; तर भगतसिंह हा एक विचार व वृत्ती आहे. स्वातंत्र्यासाठी, श्रमजीवींसाठी, शेतकऱ्यांसाठी आणि शोषितांसाठी लढणारा, संघर्ष करणारा विचार म्हणजे भगतसिंह आहे. त्यामुळे आज शरीररूपाने भगतसिंह नसले, तरी विचाररूपाने ते आजही प्रेरणादायी आहेत," असे प्रतिपादन भगतसिंह यांचे पुतणे व विचारवंत किरणजितसिंह यांनी गुरुवारी येथे पत्रकारांशी बोलताना केले. स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही सर्वसामान्य माणूस, शेतकरी यांना स्वातंत्र्य, न्याय्य हक्कांसाठी संघर्ष करावा लागतोय, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. सरहद पुणे आणि कृष्णा पब्लिकेशन यांच्या वतीने शहीद भगतसिंह यांच्या



पुतणीने लिहिलेल्या 'युगद्दष्टा भगतसिंह आणि त्यांचे मृत्युंजयी पूर्वज' या भगतसिंह यांच्या अधिकृत जीवनचरित्राचे प्रकाशन व शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढणाऱ्या राजू शेट्टी यांना 'युगद्दष्टा भगतसिंह राष्ट्रीय पुरस्कार' प्रदान सोहळ्याचे शुक्रवारी (ता. २०) आयोजन केले आहे. त्यानिमित्ताने विचारवंत किरणजितसिंह पुण्यात आले असून, पुण्यातील माध्यमांशी बोलताना त्यांनी भगतसिंह व त्यांच्या कुटुंबियांच्या आठवणींना उजाळा दिला. प्रसंगी सरहद संस्थेचे संजय नहार, कृष्णा पब्लिकेशनचे संचालक चेतन कोळी, जीवनचरित्राच्या अनुवादक इंद्रायणी चव्हाण उपस्थित होत्या.

किरणजितसिंह म्हणाले, "भगतसिंह यांच्या घराण्यात तीन पिढ्यांपासून देशासाठी व कष्टकऱ्यांसाठी संघर्षाची परंपरा होती. देशासाठी प्राणांची आहुती देणारे क्रांतिकारक, ही त्यांची एक बाजू होती. मात्र, केवळ पिस्तुल अथवा बॉंब कधीच स्वातंत्र्य मिळवून देत नाहीत. स्वातंत्र्याच्या तलवारीला धार येते, ती विचारांच्या सहाणेवर घासूनच, ही त्यांची वृत्ती होती. हे पुस्तक कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्तींच्या महत्त्वपूर्ण व अधिकृत माहितीवर आधारीत आहे. त्यामुळे या पुस्तकाचे महत्त्व वेगळे आहे. भगतसिंह यांच्यासह बलिदान केलेल्या राजगुरू, सुखदेव तसेच सर्वच क्रांतिकारकांच्या त्यागातून आजच्या युवा पिढीने प्रेरणा घ्याव. स्वतःपलीकडे जाऊन समाजाचा, देशाचा विचार करावा, त्या विचारांतून सकारात्मक कृती घडाव्यात, हा उद्देश आहे."

तेवीस वर्षांच्या भगतसिंहांनी दिलेले बलिदान आणि आजची युवापिढी या प्रश्नावर बोलताना किरणजितसिंह म्हणाले, "आजची युवा पिढी दिशाहीन, भरकटलेली आणि स्वकेंद्रित झालेली दिसते. न्याय्य, योग्य गोष्टींसाठी संघर्ष करण्याची प्रेरणाच अलीकडची पिढी हरवून बसली आहे. अशावेळी सरदार भगतसिंह यांच्या चरित्राच्या माध्यमातून नव्या पिढीसाठी उत्तम आदर्श उभा राहील, भगतसिंहांच्या मनातला देश प्रत्यक्षात यावा, त्यांचा संदेश नेमकेपणाने युवा मनांपर्यंत पोहोचावा, हा हेतू आहे. सत्तेतले लोक बदलतात; मात्र व्यवस्था तशीच आहे. त्यामुळे भगतसिंहांचे स्वराज्य अजूनही यायला वेळ लागेल. संघर्ष संपलेला नाही."

ते पुढे म्हणाले, "स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे उलटली, तरीही अनेक समस्या तशाच आहेत. आजही शेतकरी, कष्टकरी, कामगार, महिला त्यांच्या मूलभूत हक्कांपासून वंचित आहेत.

# नवीन Hyundai Exter भारतात लॉंच

- आकर्षक डिझाइन, प्रगत फीचर्स आणि दमदार सेफ्टी
- 'Drive to Shine' अनुभवासह कॉम्पॅक्ट SUV सेगमेंटमध्ये नवी भर

**गुरुग्राम : (समर्थ गांवकरी)**

Hyundai Motor India Limited ने आपल्या लोकप्रिय कॉम्पॅक्ट SUV Hyundai Exterचे नवे अपडेटेड मॉडेल भारतीय बाजारात लॉंच केले आहे. आकर्षक डिझाइन, सुधारित इंटीरियर, आधुनिक तंत्रज्ञान आणि अधिक सुरक्षितता यांसह ही SUV ग्राहकांसमोर सादर करण्यात आली आहे. कंपनीनुसार, Hyundai Exter ला आतापर्यंत देशभरात २ लाखांहून अधिक ग्राहकांचा प्रतिसाद मिळाला असून, नव्या मॉडेलमध्ये स्टायलिश एक्सटीरियर, प्रीमियम केबिन, स्मार्ट कनेक्टिव्हिटी आणि मजबूत




सेफ्टी फीचर्स देण्यात आले आहेत.

नवीन Exter मध्ये रिडिझाइन फ्रंट-रिअर बंपर, ब्लॅक रेडिएटर ग्रिल, डायमंड-कट अलॉय व्हील्स आणि विंग-टाइप स्पॉयलर देण्यात आला आहे. तसेच ही SUV आपल्या सेगमेंटमध्ये सर्वाधिक उंच आणि लांब व्हीलबेस असलेली असल्याचा कंपनीचा दावा आहे.

SUV मध्ये ड्युअल-टोन इंटीरियर, 3D कार्बन डॅशबोर्ड, D-कट स्टीअरिंग आणि मेटल पेडल्स यांसारखी वैशिष्ट्ये देण्यात आली आहेत. याशिवाय, प्रवाशांसाठी अधिक स्पेस आणि आरामदायी केबिन अनुभव देण्यात आला आहे. नवीन Exter मध्ये वायरलेस Android Auto आणि Apple CarPlay, ब्लूलिंक कनेक्टेड फीचर्स, डॅशकॅम आणि 300+ व्हॉइस कमांड्स यांसारख्या सुविधा आहेत, ज्यामुळे ड्रायव्हिंग अधिक स्मार्ट आणि सोयीस्कर बनते.

ही SUV 1.2 लिटर पेट्रोल इंजिनसह मॅन्युअल आणि AMT ट्रान्समिशनमध्ये उपलब्ध आहे. तसेच CNG ड्युअल सिलिंडर सेटअपसह पर्यायही देण्यात आला आहे, ज्यामुळे दैनंदिन वापर अधिक किफायतशीर होतो.

Hyundai Exter मध्ये 6 एअरबॅग्स, ESC, हिल-स्टार्ट असिस्टसह एकूण 45+ सेफ्टी फीचर्स देण्यात आले आहेत, ज्यामुळे प्रवाशांची सुरक्षितता अधिक मजबूत करण्यात आली आहे. नवीन Hyundai Exter ची किंमत ₹5.79 लाख ते ₹9.41 लाख (एक्स-शोरूम) दरम्यान आहे. ग्राहक ₹11,000 मध्ये बुकिंग करू शकतात.

# बहारदार गायनाने संगीत महोत्सवाची सुरुवात




**पुणे : (समर्थ गांवकरी)**

स्वर्गीय सूर, तबल्याचा ठेका, टाळांचा निनाद आणि हार्मोनियमच्या मंजुळ साथीत भारावलेल्या वातावरणात पंडित जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सवाचा बहारदार शुभारंभ झाला.

आपला परिसर आणि तरंगिनी सांस्कृतिक प्रतिष्ठानतर्फे आयोजित विसाव्या पंडित जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सवाचा प्रारंभ कोथरूड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात महापौर मंजुषा नागपुरे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. यावेळी महोत्सवाचे संयोजक माजी विरोधी पक्षनेते उज्वल केसकर, ज्येष्ठ गायक पं. शौनक अभिषेकी, बढेकर ग्रुपचे प्रमुख प्रवीण बढेकर, गोवा राज्याचे माजी मंत्री विनोद पालेकर, पूर्वा केसकर, ज्येष्ठ गायिका आशा खाडिलकर, रवींद्र खरे, महेश पानसे आदी मान्यवर उपस्थित होते.

संगीत क्षेत्रातील महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल ज्येष्ठ गायिका शैला दातार यांना 'पंडित जितेंद्र अभिषेकी प्रदीर्घ संगीत सेवा पुरस्कार' प्रदान करण्यात आला, तर जयंत केजकर यांना 'प्रथितयश पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले.

पुरस्कार स्वीकारताना शैला दातार म्हणाल्या, "पंडित जितेंद्र अभिषेकी यांच्या नावाचा पुरस्कार मिळणे हा माझ्या संगीत साधनेचा मोठा सन्मान आहे. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच मला संगीत शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मिळाली आणि विविध ठिकाणी सादरीकरणाची संधी लाभली. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवतच आम्ही या क्षेत्रात वाटचाल करत आहोत."

उज्वल केसकर यांनी सांगितले की, "आपला परिसर आणि तरंगिनी सांस्कृतिक प्रतिष्ठान यांचा २४ वर्षांचा स्नेहबंध आहे. या कालावधीत ७०० हून अधिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पं. शौनक अभिषेकी यांच्या पुढाकारामुळे देशातील नामवंत कलाकार या महोत्सवात सहभागी होत आहेत. कार्यकर्त्यांच्या निस्वार्थ सेवेमुळेच हा महोत्सव गेली २० वर्षे यशस्वीपणे सुरू आहे."

# जागतिक ग्राहक दिनानिमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन

**राहाता : (समर्थ गांवकरी)**

राहाता तहसिल कार्यालय येथे ग्राहक पंचायत महाराष्ट्र राहाता तालुका व अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण पुरवठा विभाग अहिल्यानगर जागतिक ग्राहक दिनानिमित्ताने यांच्या संयुक्त जागतिक ग्राहक दिन ग्राहक तीर्थ बिंदू माधव जोशी यांचे स्मरण व अभिवादन करून राहाता तहसील कार्यालयामध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दि.१५मार्च १९६२ रोजी ग्राहक संरक्षण कायदा जागतिक स्तरावर मंजूर करणेत आला. ग्राहक हितार्थ सुरक्षितता, ग्राहकांना वस्तु वा सेवा निवडणेचा हक्क, ग्राहकांना माहिती मिळविणेचा हक्क ,ग्राहकांचे ऐकून घेणेचा हक्क,ग्राहक शिक्षणाचा हक्क, तक्रार करणेचा हक्क वरील सर्व मुलभूत हक्क ग्राहकांना "ग्राहक संरक्षण कायदा विधेयक" मंजूर करून प्रदान करण्यात आले आहेत.

# हंगामा ओटीटी : फसवणूक आणि घातक रहस्यांच्या गुंतागुंतीचा खेळ

## पवित्रा पुनिया, जोहैब अश्रफ आणि आभास मेहता यांची प्रमुख भूमिका असलेली हंगामा ओटीटी वरील थ्रिलर जंग

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

हंगामा ओटीटी ने आपली नवीनतम क्राईम ड्रामा मालिका जंग लॉन्च केली असून, ही रोमांचक मालिका 18 मार्च 2026 रोजी प्रदर्शित झाली आहे. गुजरातमधील अलंग शीप ब्रेकिंग यार्ड या कठोर आणि वास्तववादी पार्श्वभूमीवर आधारित ही मालिका विश्वासघात, जगण्यासाठीची झुंज आणि दडलेली सत्ये यांची कहाणी उलगडते. जंग च्या कथानकाच्या केंद्रस्थानी कावेरी ही एक एकाकी गृहिणी आहे, जी आपल्या शांत आणि साध्या वाटणाऱ्या पती बकुलसोबत नीरस वैवाहिक आयुष्यात अडकलेली आहे. भावनिक आधाराच्या शोधात ती एका स्क्रॅपयार्डमध्ये काम करणाऱ्या व्यक्तीसोबत गुप्त संबंध प्रस्थापित करते. सुरुवातीला साधा वाटणारा हा संबंध लवकरच ब्लॅकमेलिंगमध्ये परिवर्तित होतो




आणि ती गुन्हेगारी, फसवणूक आणि खून यांच्या धोकादायक जाळ्यात अडकते. दरम्यान, तपासाची सूत्रे इन्स्पेक्टर सार्थक (जोहैब अश्रफ) यांच्या हाती येतात, ज्यांचा कावेरीसोबत गुंतागुंतीचा भूतकाळ आहे. तपास जसजसा पुढे सरकतो, तसतसे अधिक गडद सत्य समोर येते. कावेरी नकळत एका मोठ्या खेळाचा भाग बनलेली असते, जो तिचाच पती बकुल चालवत असतो. तो गुप्तपणे एक शक्तिशाली ड्रग साम्राज्य चालवत असून, कावेरीचा वापर आपल्या शत्रूंना संपवण्यासाठी करत असतो.

नात्यांमध्ये तडे जाऊ लागतात आणि धोका जवळ येत असताना, कावेरीला आपल्या परिस्थितीचा सामना करावा लागतो. परिस्थितीच्या टोकावर पोहोचलेली कावेरी अखेर एक असा निर्णय घेते जो सर्व काही बदलून टाकतो. ती सावल्यांमधून बाहेर येत अलंग शिपयार्डमध्ये अंतिम, जीवघेण्या संघर्षाला सामोरी जाते, जिथे जगण्यासाठीची किंमत खूप मोठी असते. कावेरीची भूमिका साकारणाऱ्या पवित्रा पुनिया म्हणाल्या, "कावेरी हे अतिशय बहुपेडी पात्र आहे, जी भावनिकदृष्ट्या अत्यंत तीव्र प्रवासातून जाते. सुरुवातीला ती परिस्थितीमुळे असहाय वाटते, पण कथानक पुढे सरकत असताना तिच्यातील ताकद आणि जिद्द समोर येते.

एका स्त्रीच्या स्वातंत्र्य आणि जगण्यासाठीच्या संघर्षाची ही कथा मला खूप भावली." इन्स्पेक्टर सार्थकची भूमिका साकारणाऱ्या जोहैब अश्रफ म्हणाले, "जंग हा असा क्राईम थ्रिलर आहे जो प्रत्येक वळणावर प्रेक्षकांना विचार करायला भाग पाडतो. गुपिते, विश्वासघात आणि अनपेक्षित ट्विस्ट्सने भरलेल्या या कथेत पोलीस अधिकाऱ्याची भूमिका साकारणे आव्हानात्मक आणि रोमांचक होते. तपास जसजसा पुढे जातो, तसतसे अधिक गडद सत्य समोर येत जाते."

# जिवा स्टोर्सचा 'अनलॉक द बॉक्स' ज्वेलरी एक्सपिरीयन्स लॉंच

## *शहरातील ग्राहकांना ₹१०,००० पर्यंत किमतीचे जिवा ज्वेलरी अनलॉक करण्याची संधी*




**पुणे : (समर्थ गांवकरी)**

देशभरात ३०० हून अधिक स्टोअर्स असलेल्या भारतातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या उत्तम दागिन्यांपैकी एक असलेल्या जिवाने पुण्यात 'अनलॉक द बॉक्स' हे इंटरएक्टिव्ह रिटेल ॲक्टिव्हेशन सुरू केले आहे. हा ब्रँड शहरातील ग्राहकांना एक अनोखा दागिने शोधण्याचा अनुभव घेण्यासाठी आमंत्रित करत आहे. मोहिमेचा एक भाग म्हणून, पुण्यातील सर्व २० जिवा स्टोअर्समध्ये पारदर्शक दागिन्यांचे बॉक्स ठेवण्यात आले आहेत, ज्यामुळे खरेदीदारांना आकर्षक बक्षिसे अनलॉक करण्यास प्रोत्साहन मिळते. ग्राहकांना त्यांच्या जवळच्या जिवा स्टोअरला भेट देण्यासाठी आणि त्यांचे नशीब आजमावण्यासाठी आमंत्रित करून शहरात चाव्या वितरित केल्या जात आहेत. सहभागी त्यांची चावी स्टोअरमध्ये आणू शकतात आणि दागिन्यांचा बॉक्स उघडण्याचा प्रयत्न करू शकतात. ज्या भाग्यवान विजेत्याची चावी बॉक्स अनलॉक करते त्याला ₹१०,००० पर्यंतचे बक्षीस मिळेल. ज्या ग्राहकांना चावी बॉक्स अनलॉक करण्यात अयशस्वी झाली त्यांना स्टोअरमध्ये विशेष सवलत देखील मिळेल. दुकानातील प्रत्येक अभ्यागताला एक संस्मरणीय अनुभव मिळावा हे एकंदर ध्येय आहे. हे सक्रियकरण १४-१५ मार्च रोजी सुरू झाले आणि उर्वरित महिनाभर सुरू राहील, ज्यामुळे पुणेकरांना एक अतुलनीय ब्रँड अनुभव मिळेल. आजच्या ग्राहकांना उत्तम दागिने उपलब्ध करून देण्याच्या दृष्टिकोनातून स्थापन झालेली जिवा एका मजबूत डीटूसी प्रणालीद्वारे देशभरात आपली उपस्थिती वेगाने वाढवत आहे. ब्रँडने आपले ऑफलाइन रिटेल नेटवर्क ३०० हून अधिक स्टोअरमध्ये वाढवले आहे. चालू मोहिमेदरम्यान, पुण्यातील ग्राहक त्यांच्या जवळच्या स्टोअरला भेट देऊन सक्रियकरणात सहभागी होऊ शकतात.

# पेटीएमकडून इन-बिल्ट कॅल्क्युलेटरची सुविधा

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

डिजिटल पेमेंट क्षेत्रातील आघाडीची कंपनी पेटीएमने आपल्या ॲपमध्ये पेमेंट स्क्रीनवरच इन-बिल्ट कॅल्क्युलेटर सादर केला आहे. या नव्या सुविधेमुळे वापरकर्त्यांना पेमेंट करण्यापूर्वीच एकूण बिलाची रक्कम त्वरित मोजता येणार आहे. या फीचरमुळे आता वेगळ्या कॅल्क्युलेटर ॲपमध्ये जाण्याची किंवा मानसिक गणित करण्याची गरज उरणार नाही. विशेष म्हणजे, एकूण रक्कम आकड्यांमध्ये तसेच शब्दांमध्ये दाखवली जाणार असल्याने पेमेंटमधील चुका टाळण्यास मदत होणार आहे. ही सुविधा प्रामुख्याने किराणा दुकानं, भाजीपाला बाजार, औषधालये आणि स्थानिक दुकाने यांसारख्या ठिकाणी उपयुक्त ठरणार आहे.

# डोंबिवलीत नववर्ष स्वागतयात्रेत १५० फुटी गुढीचे आकर्षण



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

गुढीपाडव्याच्या निमित्ताने डोंबिवलीत आयोजित नववर्ष स्वागतयात्रेत यंदा नेहरू मैदानात उभारलेली १५० फुटांची महाकाय गुढी विशेष आकर्षण ठरली. ही गुढी विशाल हिंदुत्व आणि भव्य सांस्कृतिक सोहळ्याचे प्रतीक असल्याचे भाजप महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी सांगितले. यंदा स्वागतयात्रेचे २८वे वर्ष असून, हिंदू संस्कृतीची जपणूक आणि तरुण पिढीला संस्कार देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबवला जात आहे. यावेळी 'वंदे मातरम्'च्या १५०व्या वर्षानिमित्त आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दीनिमित्त साकारलेले चित्ररथही लक्षवेधी ठरले. तसेच "क्रांतिकारी देशसेवक" या संकल्पनेवर आधारित वेशभूषा स्पर्धेलाही मोठा प्रतिसाद मिळाला. विजेत्याला २५ हजार, तर उपविजेत्याला १५ हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात आले.

# जिल्हा सत्र न्यायाधीश महाजन यांची राम मंदिरास भेट

**आळंदी : (समर्थ गांवकरी)**

तीर्थक्षेत्र आळंदीतील इंद्रायणी नदी काठावरील आवेकर भावे रामचंद्र संस्थान ट्रस्ट संचलित श्री राम मंदिरात श्री राम जन्मोत्सव वार्षिकोत्सवास हरिनाम गजरात प्रारंभ झाला असून पुणे जिल्हा सत्र न्यायाधीश तथा पुणे जिल्हा प्रमुख महेंद्र महाजन यांनी सद्दीच्छा भेट देऊन श्रींचे दर्शन घेत संगीत भक्ती गायन सेवेस दाद दिली. यावेळी जिल्हा सत्र न्यायाधीश महाजन साहेब यांनी श्रींचे दर्शन घेतले. त्या नंतर श्री संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिरात श्रींचे दर्शन घेत श्रींचे गणेशावतारातील वैभवी चंदन उटी तील लक्षवेधी रूप दर्शन घेतले. आवेकर भावे रामचंद्र संस्थानचे वतीने प्रथा परंपरांचे पालन करीत श्री रामजन्मोत्सव विविध धार्मिक, सांस्कृतिक, संगीत मेजवानी, ज्ञानेश्वर बुवा कपलाने महाराज यांची नारदीय कीर्तन सेवा आदी कार्यक्रमांचे करण्यात आले होते. या निमित्त गुढी पाडवा दिनी आयोजित कार्यक्रम त्यांनी भेट देऊन पाहणी करीत संवाद साधला. या प्रसंगी आळंदीचे नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, गटनेते सचिन गिलबिले, आवेकर भावे रामचंद्र संस्थानचे प्रमुख विश्वस्त राहुल आवेकर, विश्वस्त अर्जुन मेदनकर, चिन्मय चोभे, अविनाश गुळुंजकर, लक्ष्मीकांत दंडनाईक, रमेश मुसुडगे, जेष्ठ माजी विश्वस्त बिपीन चोभे, नरहरी महाराज चौधरी,गजानन काळे, महेश आयचित, मंगेश तिताडे, माजी विश्वस्त, पदाधिकारी, भाविक, नागरिक उपस्थित होते. यावेळी संवाद साधताना जिल्हा न्यायाधीश महेंद्र महाजन म्हणाले, आळंदी येथील मंदिरांचे विश्वस्त निवडीत युवक तरुणांना संधी देण्यात आली आहे.

# गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर 'दोराबजी हाइट्स'चे भव्य लॉन्चिंग

- अभिनेत्री सोनाली कुलकर्णी आणि स्मिता गोंदकर यांची प्रमुख उपस्थिती
- 'दोराबजी हाइट्स' खास ऑफर २ बीएचकेच्या किमतीत ३ बीएचके

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

उंड्री परिसरात उभारण्यात येत असलेल्या अत्याधुनिक निवासी प्रकल्प 'दोराबजी हाइट्स'चा भव्य लॉन्चिंग सोहळा गुढी पाडव्याच्या शुभ मुहूर्तावर मोठ्या उत्साहात पार पडला. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध अभिनेत्री सोनाली कुलकर्णी आणि स्मिता गोंदकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी घर खरेदीदारांसाठी आकर्षक अशी २ बीएचकेच्या



किमतीत ३ बीएचके फ्लॅट ऑफर जाहीर करण्यात आली. या प्रकल्पातील फ्लॅट्सची किंमत ८१ लाख रुपयांपासून सुरू होत असल्याची माहिती आयोजकांनी दिली. बांधकाम क्षेत्रातील विश्वासार्ह नाव म्हणून ओळख असलेल्या दोराबजी समूहाचा हा प्रकल्प असून त्याची उभारणी दोराबजी, मन्नत असोशीएट आणि रितेश अग्रवाल व्हेंचर्स यांच्या संयुक्त विद्यमाने केली जात आहे. अत्याधुनिक सोयी-सुविधांनी सज्ज, प्रशस्त आणि निसर्गरम्य परिसरात उभारला जाणारा हा प्रकल्प घर खरेदीदारांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे.

या प्रसंगी जहांगीर दोराबजी, डॅनियल दोराबजी, रितेश अग्रवाल व्हेंचर्सचे संस्थापक सतीश अग्रवाल, संचालक रितेश अग्रवाल, मनीष अग्रवाल, अंकुश अग्रवाल, अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, अभिनेत्री स्मिता गोंदकर, अखिल भारतिय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले, चित्रपट निर्माता - दिग्दर्शक अनिल काकडे, अमन घई तसेच मन्नत असोशीएटचे सर्व संचालक आणि विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी बोलताना अभिनेत्री सोनाली कुलकर्णी म्हणाली, बांधकाम क्षेत्र आणि चित्रपटसृष्टी यांच्यात एक साम्य आहे ते म्हणजे घर. कलाकार लोकांच्या मनात घर करतात तर बांधकाम व्यावसायिक लोकांच्या मनातील घर निर्माण करतात. दोराबजी हाइट्स हा प्रकल्प निसर्गरम्य परिसरात असून येथील वातावरण अतिशय सकारात्मक आणि आनंददायी आहे. येथील फ्लॅट्स अत्यंत प्रशस्त असून मध्यवर्गीय कुटुंबालाही परवडतील अशा दरात उपलब्ध आहेत. त्यामुळे नवीन घराच्या शोधात असलेल्या नागरिकांनी या प्रकल्पाला नक्की भेट द्यावी." यावेळी अभिनेत्री स्मिता गोंदकर म्हणाली,, "उंड्री परिसर प्रचंड विकसित झाला आहे, यांचा मला आनंद होतोय. मी वास्तु शास्त्र मानते आणि मला 'दोराबजी हाइट्स' ही एक परफेक्ट वास्तु असल्याचे दिसले. घरात भरपूर सूर्यप्रकाश, मोकळी हवा आणि सकारात्मक वातावरण असणे तितकेच महत्त्वाचे असते. प्रशस्त जागा, सुंदर रचना आणि मोक्याचे स्थान यामुळे हा प्रकल्प खरेदीदारांसाठी आकर्षक ठरेल. गुढी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर किफायतशीर दरात उत्तम घर मिळविण्याची ही चांगली संधी आहे." जहांगीर दोराबजी म्हणाले, "वास्तुशास्त्र हे एक विज्ञान असून त्यानुसारच आमचे प्रकल्प उभारले जातात. आमचा कॅपिटल बिल्ट-अप रेशो कमी असल्यामुळे ग्राहकांना परवडणाऱ्या किमतीत प्रशस्त आणि प्रीमियम सदनिका उपलब्ध करून देणे शक्य होते. मोठ्या आणि आरामदायी फ्लॅट्स ही आमची खासियत असून या प्रकल्पात २ बीएचकेच्या किमतीत ३ बीएचके देण्याची ऑफर ग्राहकांसाठी खास ठरणार आहे."

रितेश अग्रवाल यांनी सांगितले की, "दोराबजी हाइट्समध्ये ३० हून अधिक अत्याधुनिक ॲमेनिटीज देण्यात येत आहेत. हिलसाइड व्ह्यू, शांत निवासी परिसर आणि शाळा, रुग्णालये, मॉल्स तसेच हायस्ट्रीटसारख्या पायाभूत सुविधांच्या जवळ हा प्रकल्प आहे. येथे स्विमिंग पूल, दोन कम्युनिटी हॉल, मल्टी-क्युजिन रेस्टॉरंट, कार्यक्रमांसाठी ओपन एरिया, रुफटॉप सुविधा यांसह कंट्री क्लबचे मोफत सदस्यत्वही देण्यात येणार आहे."

# वृद्धत्वाची नवी व्याख्या; “बचपना शुडन्ट रिटायर”ची राष्ट्रीय हाक

## एमएस धोनीची मेरिलच्या वापी कॅम्पसमध्ये पहिली भेट; ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्यासाठी समर्पित उपक्रमासह 'ट्रीटमेंट जरुरी है' (Treatment Zaroori Hai) मोहिमेला बळकटी

**वापी : (समर्थ गांवकरी)**




मेरिलच्या वापी येथील जागतिक मुख्यालयाला दिलेल्या पहिल्या भेटीदरम्यान, भारताचा माजी क्रिकेट कर्णधार एमएस धोनी याने “बचपना शुड्न्ट रिटायर” या विषयावर मनमोकळा आणि प्रेरणादायी संवाद साधला. “बचपना शुड्न्ट रिटायर” हा मेरिलच्या राष्ट्रव्यापी सार्वजनिक आरोग्य चळवळ असलेल्या “ट्रीटमेंट जरुरी है” चाच एक पुढचा टप्पा आहे. ही मोहीम वेळेवर निदान आणि प्रगत वैद्यकीय उपचारांच्या उपलब्धतेविषयी जागरूकता वाढवण्यासाठी सुरू करण्यात आली आहे. या मोठ्या चळवळीचा एक केंद्रित विस्तार म्हणून, “बचपना शुड्न्ट रिटायर” हा 'ट्रीटमेंट जरुरी है' अंतर्गत ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्यासाठी एक समर्पित उपक्रम सादर करतो. ही मोहीम यावर भर देते की लवकर निदान, प्रतिबंधात्मक तपासण्या आणि नाविन्यपूर्ण उपचार पर्यायांमुळे हृदयविकार, ऑर्थोपेडिक (हाडांचे विकार) आणि वयाशी संबंधित इतर आजारांच्या परिणामांमध्ये लक्षणीय सुधारणा होऊ शकते – ज्यामुळे जीवनाच्या सुवर्णकाळात स्वातंत्र्य आणि जीवनमान राखले जाते. ही मोहीम एका साध्या पण शक्तिशाली विश्वासाचा पुरस्कार करते – वय वाढत असले तरी खेळकरपणा, उत्सुकता आणि आनंदाची भावना कधीही कमी होता कामा नये. भारतातील वृद्ध लोकसंख्येमध्ये जीवनशैलीशी संबंधित आजारांमध्ये सातत्याने वाढ होत असताना, जीवनातील प्रत्येक टप्प्यावर आदर आणि उत्साह टिकवून ठेवण्याचे महत्त्व या संवादातून अधोरेखित करण्यात आले. या मोहिमेच्या सखोल उद्देशाविषयी बोलताना एमएस धोनी म्हणाला, “माझा नेहमीच असा विश्वास आहे की आपल्या आरोग्याची काळजी घेणे ही तुम्ही स्वतःसाठी आणि तुमच्यावर प्रेम करणाऱ्या लोकांसाठी करू शकत असलेल्या सर्वात महत्त्वाच्या गोष्टींपैकी एक आहे. विशेषतः तरुण पिढीची ही जबाबदारी आहे की आपल्या पालकांना आणि आजी-आजोबांना त्यांच्या हक्काची काळजी, लक्ष आणि आधार मिळेल याची खात्री करावी. 'ट्रीटमेंट जरुरी है' सारखे उपक्रम त्या दिशेने टाकलेले एक पाऊल आहे आणि मला याचा एक भाग असल्याचा आनंद आहे.” कुटुंबांसाठी एक राष्ट्रीय चळवळ एक राष्ट्रव्यापी डिजिटल सहभाग चळवळ म्हणून कल्पिलेली ही मोहीम, तरुण भारतीयांना त्यांच्या आजी-आजोबांसोबत अर्थपूर्ण वेळ घालवण्यासाठी प्रोत्साहित करते – मग तो बालपणीचा एखादा खेळ पुन्हा खेळणे असो, एखादा छंद जोपासणे असो किंवा आनंदाचा एखादा प्रसंग टिपणे असो. भावनिक जोडणीची प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा जागरूकतेशी सांगड घालून, हा उपक्रम भावनिक आणि शारीरिक आरोग्य दोन्ही हातात हात घालून चालतात यावर भर देतो. निरोगी वृद्धत्वावर लक्षणीय परिणाम करणाऱ्या जीवनशैलीशी संबंधित आरोग्य समस्यांमध्ये भारतात झपाट्याने वाढ होत आहे. इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च (ICMR) आणि ग्लोबल बर्डन ऑफ डिसीज (GBD) च्या अभ्यासानुसार, भारतातील एकूण मृत्यूंपैकी जवळपास २८% मृत्यू हे हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी आजारांमुळे होतात.

# अहिल्यानगरमध्ये गोतस्करीचा भंडाफोड

## ३ गोवंशांची सुटका, १.६५ लाखांचा मुद्देमाल जप्त!

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

जिल्ह्यात गोतस्करीविरोधात नगर तालुका पोलिसांनी गोरक्षकांच्या मदतीने धडाकेबाज कारवाई करत मोठे यश मिळवले आहे. या कारवाईत ३ गोवंशांची सुटका करण्यात आली असून सुमारे १ लाख ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दि. १५ मार्च २०२६ रोजी मानद पशुकल्याण अधिकारी चांगदेव गोरख भालसिंग यांनी नगर तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती. बाबुर्डी येथील वाळकी रोडवरून पिकअप वाहनाद्वारे गोवंश कत्तलीसाठी नेला जात असल्याची माहिती त्यांनी दिली होती. गोरक्षकांनी वाहन थांबवण्याचा प्रयत्न केला असता चालक वाहनासह पसार झाला होता. यानंतर पोलिसांनी तात्काळ गुन्हा दाखल करून तपास सुरू केला.



प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथकाने दि. १९ मार्च रोजी बाबुर्डी बेंद परिसरात सापळा रचला. गुप्त माहितीच्या आधारे अरबाज पठाण (वाळकी) व चालक विजय मोहिते यांना रंगेहात पकडण्यात आले.

आरोपी पिकअप वाहनातून एक खिल्लार जातीचे गोवंश, एक देशी नंदी आणि एक HF जातीची कालवड अशा तीन जनावरांची बेकायदेशीर वाहतूक करत असल्याचे उघड झाले. पोलिस व गोरक्षकांच्या सतर्कतेमुळे या जनावरांची सुरक्षित सुटका करण्यात आली.

या कारवाईदरम्यान चांगदेव भालसिंग यांनी पोलिसांना मोलाची मदत केली. पोलिसांनी एकूण १,६५,००० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला असून आरोपींविरुद्ध पुढील तपास सुरू आहे. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्मे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पार पडली. या कारवाईमुळे परिसरात समाधान व्यक्त होत असून गोतस्करीविरोधात पोलिसांनी कडक भूमिका घेतल्याचे पुन्हा स्पष्ट झाले आहे.

# सेप्ट युनिव्हर्सिटीने मास्टर्स इन फर्निचर डिझाईन अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रियेची केली घोषणा

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

सेप्ट युनिव्हर्सिटीने मास्टर्स इन फर्निचर डिझाईन (एमएफडी) या अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रियेची घोषणा केली आहे. डिझाईन क्षेत्रातील पुढील पिढीचे व्यावसायिक आणि उद्योजक घडविणे हा या अभ्यासक्रमाचा उद्देश आहे. नोंदणी ३१ मार्च २०२६ पर्यंत सुरू राहणार आहे

राहत्या घरातील नाजूक अंतर्गत सजावटीपासून ते गतिमान कार्यस्थळांपर्यंत आज फर्निचर आपल्या जगण्याच्या, कामाच्या आणि परस्पर संवादाच्या पद्धतीला आकार देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. सेप्टचा एमएफडी कार्यक्रम या बदलाला प्रतिसाद देणारा आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव आणि अशी कौशल्ये शिकवली जातात, जी त्यांना फर्निचर क्षेत्रातील विविध शक्यता

CEPT UNIVERSITY

आणि खाचाखोचा समजून घेण्यास मदत करतात. यामध्ये ऑनलाइन बाजारपेठांपासून ते भाड्याने देण्याच्या सेवांपर्यंत, मोठ्या उद्योगांच्या मोठ्या प्रमाणावरील उत्पादन प्रणालींपासून ते सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या (एमएसएमई) मोठ्या प्रमाणावरील उत्पादनापर्यंतच्या बाबींचा समावेश आहे. रचनात्मकता आणि तांत्रिक कौशल्य यांचा संगम साधणे हा या कार्यक्रमाचा गाभा आहे. यात विद्यार्थ्यांना साहित्य, उत्पादन प्रक्रिया, प्रोटोटाइपिंग, अर्गोनॉमिक्स आणि डिझाईनचे तपशील यांचा प्रत्यक्ष अनुभव मिळतो. त्याचबरोबर त्यांना उद्योगाचे व्यावसायिक आणि आर्थिक पैलू देखील समजतात. मॉड्यलर सिस्टीमची रचना करणे असो, नवीन साहित्यासोबत प्रयोग करणे असो किंवा विस्तारक्षम (स्केलेबल) फर्निचर सोल्यूशन्स तयार करणे असो, हा कार्यक्रम विद्यार्थ्यांना डिझाईनर आणि इनोव्हेटर या दोन्ही भूमिकांमधून विचार करण्यास प्रोत्साहित करतो.

'स्टुडिओ युनिट' प्रणाली हे सेप्ट च्या शिक्षणपद्धतीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. यामध्ये छोट्या व सहयोगात्मक गटांमध्ये शिक्षण देण्यात येते व प्राध्यापकांचे जवळचे मार्गदर्शन लाभते. डिझाईन स्टुडिओ हे फर्निचर डिझाईनची मूलतत्त्वे, नाविन्यपूर्ण साहित्य आणि तंत्रज्ञान, सार्वजनिक वापरासाठीचे फर्निचर, सिस्टीम डिझाईन आणि उद्योग-सहयोगी स्टुडिओ यांसारख्या संकल्पनांवर आधारित आहेत.

# टाटा मोटर्सची प्रवासी वाहने महागणार

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

टाटा मोटर्सच्या नुकत्याच झालेल्या व्यावसायिक वाहनांच्या किंमत वाढीनंतर आता प्रवासी वाहनांच्या किंमतीतही वाढ करण्याचा निर्णय कंपनीने घेतला आहे. उपलब्ध माहितीनुसार, प्रवासी वाहनांच्या किंमतीत अर्धा टक्का वाढ करण्यात येणार आहे. ही वाढ येत्या १ एप्रिल २०२६ पासून लागू होईल. ही किंमतवाढ उत्पादन खर्चामध्ये सातत्याने होत असलेल्या वाढीचा काही अंशी परिणाम कमी करण्यासाठी करण्यात येत आहे. आयसीई पोर्टफोलिओवर सरासरी ०.५% इतकी किंमतवाढ होणार असून, ही वाढ वेगवेगळ्या मॉडेल्स आणि व्हेरिएंटनुसार बदलू शकते, अशी माहिती कंपनीच्या प्रवक्त्यांनी दिली आहे.

# कॅपिटालँडने पुण्यातील होप स्कूल प्रोग्राम केला अधिक मजबूत

- १,४०० हून अधिक विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून दिले
- पुण्यातील फेज २ च्या पूर्ततेसह होप स्कूल प्रोग्रामने भारतातील ३,००० हून अधिक मुलांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणला आहे

**पुणे : (समर्थ गांवकरी)**




कॅपिटालँड होप फाउंडेशनने (सीएचएफ) या कॅपिटालँड ग्रुपच्या परोपकारी शाखेने आज पुण्यातील आपल्या होप स्कूल प्रोग्रामच्या फेज 2 च्या पूर्ततेची घोषणा केली. या विस्तारामुळे आता एकूण 1,400 हून अधिक विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाच्या संधी उपलब्ध होणार आहेत. कॅपिटालँड इन्व्हेस्टमेंट इंडियाचे अध्यक्ष श्री. किशोर मोरजानी, भोरवाडी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. नंदकुमार लक्ष्मण भोर आणि कॅपिटालँडच्या कर्मचारी स्वयंसेवकांच्या उपस्थितीत फेज 2 चे अधिकृत उद्घाटन करण्यात आले. या टप्प्याच्या पूर्ततेमधून कॅपिटालँड कार्यरत असलेल्या समुदायांमधील गरजू मुलांच्या शिक्षणासाठी आणि कल्याणासाठी असलेली सीएचएफची कटिबद्धता दिसून येते. या नवीन टप्प्यांतर्गत हिंजवडीतील भोरवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक आणि माध्यमिक शाळेत जवळपास 12,000 चौरस फूट क्षेत्रफळात 19 नवीन वर्गखोल्या बांधण्यात आल्या आहेत. 2023 मध्ये पूर्ण झालेल्या पहिल्या टप्प्यानंतर ही पुढील प्रगती आहे. पहिल्या टप्प्यात शाळेचे नूतनीकरण करून नवीन वर्गखोल्या आणि स्वच्छतागृहे बांधण्यात आली होती, तसेच वाचनालय, संगणक आणि विज्ञान प्रयोगशाळांसारखी नवीन संसाधने उपलब्ध करून दिली होती, ज्यासाठी स्थानिक प्रशासनाचे मोठे सहकार्य लाभले होते. या विस्तारामुळे शाळेची क्षमता वाढली आहे, ज्यामुळे, आता पूर्वीपेक्षा दुप्पट म्हणजेच 760 अतिरिक्त विद्यार्थ्यांना प्रवेश देणे शक्य झाले आहे. सुसज्ज वर्गखोल्या, अद्ययावत शैक्षणिक साधने आणि सुधारित पायाभूत सुविधांमुळे ही शाळा विद्यार्थ्यांना त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सुरक्षित आणि अनुकूल वातावरण प्रदान करते. कॅपिटालँड होप फाउंडेशन (इंडिया) चे संचालक आणि कॅपिटालँड इंडिया ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. गौरी शंकर नागभूषणम म्हणाले, “महाराष्ट्रभरातील बिझनेस पार्क्स, डेटा सेंटर्स, लॉजिस्टिक्स आणि इंडस्ट्रियल पार्क्समध्ये कॅपिटालँडची उपस्थिती मोठी आहे, तसेच सातत्याने वाढत आहे.

# गॅस दरवाढ व तुटवड्याविरोधात शिवसेना महिला आघाडी आक्रमक

## जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन

**बुलडाणा : (समर्थ गांवकरी)**



राज्यात घरगुती व व्यावसायिक गॅसचा वाढता तुटवडा आणि दरवाढ याविरोधात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) महिला आघाडीने आक्रमक भूमिका घेतली आहे. यासंदर्भात तालुकाप्रमुख यांनी मुख्यमंत्री यांना निवेदन सादर करून तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. हे निवेदन जिल्हाधिकारी, बुलडाणा यांच्या मार्फत पाठविण्यात आले आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सध्या गुढीपाडवा व रमजानसारख्या सणासुदीच्या काळातही गॅसचा गंभीर तुटवडा निर्माण झाला असून, सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. गॅस सिलेंडर बुक केल्यानंतर वेळेवर OTP मिळत नसल्याने तसेच बुकिंग प्रक्रिया सुरळीत नसल्याने नागरिकांना तासन्तास रांगेत उभे राहूनही सिलेंडर मिळत नाही.

तसेच, अधिकृत प्रक्रियेत गॅस उपलब्ध नसताना अतिरिक्त दोन ते अडीच हजार रुपये दिल्यास सहज सिलेंडर मिळत असल्याच्या तक्रारी समोर येत असून, यामध्ये मोठ्या प्रमाणावर काळाबाजार सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकारामुळे सामान्य नागरिकांची आर्थिक लूट होत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, घरगुती गॅस सिलेंडरच्या दरात करण्यात आलेली ६० रुपयांची वाढ तात्काळ मागे घ्यावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. याशिवाय व्यावसायिक गॅसचा पुरवठा ठप्प झाल्यामुळे हॉटेल, खानावळ व लघुउद्योजकांवर गंभीर परिणाम झाला असून, हजारो कुटुंबांचा उदरनिर्वाह धोक्यात आल्याचेही निदर्शनास आणून देण्यात आले आहे. शिवसेना महिला आघाडीने सरकारकडे गॅस पुरवठा सुरळीत करणे, बुकिंग प्रक्रियेत पारदर्शकता आणणे, काळाबाजार रोखण्यासाठी कठोर कारवाई करणे, व्यावसायिक गॅसचा पुरवठा तात्काळ पूर्ववत करणे तसेच बाधित व्यावसायिक व विद्यार्थ्यांना आर्थिक मदत जाहीर करण्याची मागणी केली आहे. सरकारने या प्रश्नाकडे तातडीने लक्ष देऊन सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलनाचा इशाराही यावेळी देण्यात आला आहे.

यावेळी अनिताताई जाधव, भावनाताई पाटील, स्मिताताई वराडे, अर्चनाताई शेळके, सुनंदाताई खरात, रत्नाताई शेळके, पुजाताई शिंगणे, रोशनीताई गरड, अश्विनीताई फदाट, आम्रपाली कंकाळ, शालिनीताई जाधव, शितलताई सुरडकर, वंदनाताई मेढे, कविताताई पवार, निताताई चव्हाण, वैशालीताई मिसाळ, सुनिताताई सुरडकर, सुवर्णाताई जाधव, सविताताई राऊत, सुनिताताई दराखे, सविताताई बैरागी, मनीषाताई इंगळे, रुपालीताई चव्हाण, राधिकाताई सिरसाठ, यशोदाताई देशमुख, पल्लवीताई शेळके, स्वातीताई लोंढेकर, भारतीताई भारंबे, बेबीताई परिहार, शारदाताई दाभाडे यांच्यासह महिला आघाडीच्या सर्व पदाधिकारी उपस्थित होत्या.

# मोतीबिंदूमुक्त महाराष्ट्रासाठी सर्वांचे योगदान आवश्यक

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र करण्यासाठी समाजातील सर्व घटकांचे योगदान आवश्यक आहे. प्रत्येकाने आपली जबाबदारी पार पाडल्यास मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र साध्य करणे सहज शक्य होईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केले. नेत्रआरोग्य क्षेत्रात मोलाचे कार्य करत समाजसेवेचा आदर्श निर्माण करणारे आर. झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल, पनवेल तसेच शंकरा आय फाउंडेशन इंडिया या संस्था रुग्णसेवेसाठी सातत्याने कार्यरत आहेत. अत्याधुनिक तंत्रज्ञान, अनुभवी डॉक्टरांचा कार्यसंघ आणि समाजाभिमुख उपक्रमांच्या माध्यमातून या संस्थांनी हजारो रुग्णांना दृष्टीदान करून त्यांच्या आयुष्यात प्रकाश आणला आहे.

# गुढीपाडवा हिंदू अस्मितेची आठवण करून देणारा सण

## आमदार खताळ; कुटुंबीयांसह पारंपरिक पद्धतीने गुढी उभारली

**संगमनेर : (समर्थ गांवकरी)**



गुढीपाडवा सण म्हणजे नवे संकल्प, नवी ऊर्जा आणि आशा घेऊन येणारा प्रेरणादायी क्षण असून आपल्या समृद्ध संस्कृतीची व हिंदू अस्मितेची आठवण करून देणारा हा अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे, असे गौरवोद्गार आमदार अमोल खताळ यांनी काढले. गुढीपाडवा आणि हिंदू नववर्षाच्या शुभमुहूर्तावर आमदार खताळ यांनी आपल्या कुटुंबीयांसमवेत साई हर्ष निवास स्थानी पारंपरिक पद्धतीने गुढी उभारून नववर्षाचे उत्साहात स्वागत केले. यावेळी आमदार खताळ यांच्या पत्नी नीलम खताळ बंधू राहुल खताळ आणि कुटुंबीय उपस्थित होते. आमदार खताळ म्हणाले की, “गुढीपाडवा हा सण केवळ नववर्षाची सुरुवात नसून नवीन सकारात्मक विचार आणि प्रगतीच्या दिशेने वाटचाल करण्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे. या दिवशी उभारलेली गुढी ही विजय, समृद्धी आणि शुभतेचे प्रतीक आहे.”तसेच , या नववर्षात सर्वांच्या जीवनात सुख, समाधान, उत्तम आरोग्य, यश आणि भरभराट नांदो, अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो. समाजातील प्रत्येक घटकाने एकत्र येत आनंद, एकोपा आणि सकारात्मकतेने नववर्ष साजरे करावे, असे आवाहन आमदार अमोल खताळ यांनी केले आहे.

# २० वा ‘पं. जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सव’ शुक्रवारपासून

**पुणे : (समर्थ गांवकरी)**




भारतीय शास्त्रीय संगीत क्षेत्रातील अजरामर नाव असलेल्या पं. जितेंद्र अभिषेकी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित २० वा ‘पं. जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सव’ येत्या २०, २१ आणि २२ मार्च २०२६ रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, कोथरूड येथे संपन्न होणार आहे. तारंगिणी सांस्कृतिक प्रतिष्ठान तर्फे आयोजित या तीन दिवसीय महोत्सवात देशभरातील नामवंत तसेच युवा कलाकार आपली कला सादर करणार असून, शास्त्रीय गायन, वादन, नाट्यसंगीत आणि नृत्य यांचा संगम रसिकांना अनुभवता येणार आहे. महोत्सवाचे उद्घाटन २० मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाची रूपरेषा : २० मार्च रोजी सायंकाळी ‘स्वराभिषेक’ या संकल्पनेतून नाट्यभाव भक्ती संगीताची विशेष मैफल सादर होणार आहे. यामध्ये राजयोग धुरी, विश्वजित मैत्रेयी, अंजली गायकवाड, नंदिनी गायकवाड आदी कलाकार सहभागी होणार आहेत. २१ मार्च रोजी सकाळी ९ वा. च्या सत्रात शर्वरी दिघेकर-फोकळे यांचे गायन, पार्थ भुमकर व प्रथ्मेश तारळकर यांचे जुगलबंदी सादरीकरण आणि श्रुती ढोकळकर यांचे गायन होणार आहे. सायंकाळी ६ वाजता पं. राम शंकर, डॉ. राजा काळे आणि पद्मविभूषण डॉ. एन. राजम (व्हायोलिन) यांचे सादरीकरण रंगणार आहे.

# बनाई देवी यात्रा उत्सव २१ ते २४ मार्च दरम्यान साजरा होणार

## यात्रेनिमित्त नामवंत निकाली कुस्त्यांचे आयोजन आकर्षक बक्षिसे

**पारनेर (समर्थ गांवकरी)**



अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर हे गाव जागृत ग्रामदैवत माता बनाई देवीच्या श्रद्धास्थान म्हणून प्रसिद्ध आहे. पंचक्रोशीतील सर्व धर्मीय भाविकांसाठी हे ठिकाण विशेष महत्त्वाचे आहे. येथील बनाई देवी यात्रा उत्सव यंदा उत्साहपूर्ण व भव्य स्वरूपात साजरा होणार असून, यात्रेची सर्व तयारी पूर्ण झाली आहे. यात्रा २१ ते २४ मार्च २०२६ या कालावधीत होत असून, गुढीपाडव्याच्या तिसऱ्या दिवसापासून हा उत्सव सुरू होईल.

श्री बनाई देवी सार्वजनिक यात्रा उत्सव कमिटीच्या नेतृत्वाखाली विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यात्रेच्या प्रमुख आकर्षणांपैकी एक म्हणजे भव्य निकाली कुस्त्यांचा जंगी आखाडा. या कुस्त्यांसाठी ४० नामवंत पैलवानांची जोड्या जाहीर करण्यात आल्या असून, आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. यामध्ये पैलवान महेश फुलमाळी विरुद्ध पैलवान आकाश चव्हाण (३१ हजार रुपये), पैलवान अंकित धुळगंड विरुद्ध पैलवान ऋत्विक बिन्नर (२५ हजार रुपये), पैलवान रोहन परदेशी विरुद्ध पैलवान गोवर्धन शिंदे (२१ हजार रुपये), पैलवान अवि साळवे विरुद्ध पैलवान रामा सुरडकर (२१ हजार रुपये), पैलवान सार्थक वाळुंज विरुद्ध पैलवान कुमार देशमाने (१५ हजार रुपये), पैलवान अतुल नाईकल विरुद्ध पैलवान गणेश फडके (११ हजार रुपये), पैलवान दिनकर पवार विरुद्ध पैलवान भाऊसाहेब वरे (११ हजार रुपये), पैलवान सौरभ मराठी विरुद्ध पैलवान पवन डोनर (१० हजार रुपये) अशा प्रमुख लढती होणार आहेत. विजेत्या पैलवानांना यात्रा कमिटीचे अध्यक्ष पै. संपत शेठ तराळ व उपसरपंच रामभाऊ तराळ यांच्यावतीने आकर्षक चषक, तसेच मराठा महासंघ पारनेर तालुका अध्यक्ष विक्रम शेठ झावरे व बबलू शेठ जयसिंग झावरे पाटील यांच्याकडून मानाची गदा बक्षीस म्हणून देण्यात येणार आहे. ही कुस्ती सोमवार, २३ मार्च रोजी दुपारी ४ वाजता आयोजित आहे.

यात्रेचे इतर प्रमुख कार्यक्रम खालीलप्रमाणे आहेत: शनिवार, २१ मार्च २०२६ – सायंकाळी ८ वाजता हजरत शादवल शाह र.ह. / फकिरबाबा संदलचा कार्यक्रम.

रविवार, २२ मार्च – सकाळी ८ वाजता बनाईदेवी काठी मिरवणूक, रात्री ८ वाजता छबीना मिरवणूक, रात्री १० वाजता लोकनाट्य तमाशा.

सोमवार, २३ मार्च – सकाळी ८ वाजता मळगंगादेवी काठी मिरवणूक, दुपारी ४ वाजता कुस्त्यांचा जंगी आखाडा, रात्री ८ वाजता छबीना, रात्री १० वाजता ऑर्केस्ट्रा.

मंगळवार, २४ मार्च – सकाळी ८ वाजता मुक्ताईदेवी काठी मिरवणूक, रात्री ८ वाजता मुक्ताईदेवी छबीना, रात्री १० वाजता ऑर्केस्ट्रा.

तसेच २४ व २५ मार्च रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत बैलगाड्यांच्या भव्य शर्यती आयोजित आहेत. संपूर्ण यात्रेदरम्यान फटाके व दारुगोळ्याची भव्य आतीशबाजी पाहायला मिळेल.

हा उत्सव सर्वधर्मीयांच्या एकतेचे प्रतीक आहे. हजारो भाविकांची उपस्थिती अपेक्षित असून, यात्रा कमिटीचे अध्यक्ष संपतराव तराळ, उपाध्यक्ष संजय खिलारी (मेजर), बैलगाडा संघटनेचे अध्यक्ष बाळशिरम पायमोडे, विक्रमशेठ झावरे, अंकुशशेठ पायमोडे, मळीभाऊ रांधवन, विकास आल्हाट यांच्या नेतृत्वाखाली तयारी जोमाने सुरू आहे. सर्व भाविक, पैलवान प्रेमी व नागरिकांनी या भव्य यात्रेत सहभागी होऊन उत्सव यशस्वी करण्याचे आवाहन कमिटीने केले आहे. टाकळी ढोकेश्वरची ही यात्रा धार्मिक श्रद्धा, सांस्कृतिक वैभव व सामाजिक एकतेचा उत्सव म्हणून स्थानिक स्तरावर विशेष ओळखली जाते.